दैनिक
# जनता आवाज

**पीएमच्या दौऱ्यापूर्वीच बॉम्बची धमकी**

**मोहाली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंजाब दौऱ्यापूर्वी मोहालीतील ६ शाळांना सकाळी-सकाळी बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. यानंतर शाळा बंद करण्यात आल्या. प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. माहिती मिळताच पोलीस, बॉम्बशोधक पथके शाळांमध्ये पोहोचली. परिसराची कसून तपासणी केली जात आहे. फेज-६ मधील शिवालिक पब्लिकला सकाळी सुमारे ९ वाजता अधिकृत ईमेलवर धमकीचा संदेश आला. शिवालिकच्या समन्वयकाने सांगितले की, जेव्हा हा ईमेल आला तेव्हा दुसरा तास सुरू होता. आता पथके तपास करत आहेत. मुलांना घेऊन जाण्यासाठी आम्ही पालकांना संदेश पाठवला आहे.

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक १३८ वा | मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

**आजचे हवामान**

कमाल 31°C | किमान 22°C

| पेट्रोल | डिझेल |
|---|---|
| 111.21 | 97.83 |

| सोने | चांदी |
|---|---|
| 1,42,080 | 2,19,658 |

# ...अखेर महावितरण जागे झाले

## 'दैनिक जनता आवाज'च्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अनधिकृत वायर हटविण्याची मोहीम सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर : महावितरणच्या वीज खांबांवर वर्षानुवर्षे वाढत गेलेल्या अनधिकृत इंटरनेट व केबलच्या जाळ्याविरोधात अखेर कारवाईला सुरुवात झाली आहे. शहरातील सुमारे ४० वीज खांबांवरील अनधिकृत केबल व इंटरनेटच्या वायर हटविण्यात आल्याने त्या पोलनी जणू मोकळा श्वास घेतला आहे. मात्र, शहरातील अनेक भागांमध्ये आजही वीज खांबांवर वायरचे जाळे लटकताना दिसत आहे. त्यामुळे ४० पोल मोकळे झाले, पण उर्वरित पोल कधी मोकळा श्वास घेणार? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.**



नेवासा शहरात अनेक वर्षांपासून महावितरणच्या खांबांचा वापर करून विविध इंटरनेट आणि केबल सेवा पुरवठादारांनी अनधिकृतपणे वायरचे जाळे उभारले होते. या वायरमुळे रस्त्यांवरून जाणाऱ्या नागरिकांना, वाहनचालकांना आणि विशेषतः पावसाळ्यात मोठा धोका निर्माण झाला होता. अनेक ठिकाणी वायर खाली लोंबकळत असल्याच्या तक्रारी वारंवार होत होत्या. तरीही संबंधित यंत्रणा दीर्घकाळ कारवाईपासून दूर राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती.

या गंभीर प्रश्नाला दैनिक जनता आवाजने सातत्याने वाचा फोडली. वृत्तमालिका, नागरिकांच्या प्रतिक्रिया आणि प्रशासनाला थेट प्रश्न विचारत हा विषय सातत्याने लावून धरला. अखेर प्रशासनाला जाग आली आणि महावितरणने अनधिकृत वायर हटविण्याची मोहीम सुरू केली. त्यामुळे शहरातील सुमारे ४० पोलवरील वायर हटविण्यात आल्या असून नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

**सडेतोड** जनता आावाज

**महेश रक्ताटे**

**मो. ८८९६७११७११**

मात्र, कारवाई सुरू झाली असली तरी ती अद्याप अपुरी असल्याचे चित्र आहे. अनेक भागांतील वीज खांबांवर अजूनही इंटरनेट आणि केबलच्या वायरचे जाळे कायम आहे. काही ठिकाणी पोल पूर्णपणे स्वच्छ करण्यात आले आहेत, तर काही ठिकाणी एकाही वायरला हात लावण्यात आलेला नाही. त्यामुळे सर्वांसाठी एकच नियम की काहींसाठी वेगळे नियम? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. महावितरणने अर्धवट कारवाई करून थांबता कामा नये. शहरातील प्रत्येक वीज खांबावरील अनधिकृत वायर हटविण्यात यावी. कोणत्याही ऑपरेटरला विशेष सवलत किंवा मुदत देऊ नये. सर्वांवर समान निकष लावून कारवाई झाली तरच या मोहिमेवर नागरिकांचा विश्वास बसेल.

दरम्यान, महावितरणकडून संबंधित इंटरनेट व केबल सेवा पुरवठादारांना स्वतःच्या वायर काढून घेण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, काही ठिकाणी अद्यापही वायर कायम असल्याने प्रशासनाची भूमिका चर्चेचा विषय ठरत आहे. कारवाईचा वेग वाढवून शहर वायरमुक्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

या संपूर्ण प्रकरणात दैनिक जनता आवाजने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. अनेक नागरिकांनी प्रतिनिधींशी संपर्क साधून अभिनंदन केले असून, शहरातील इतर धोकादायक ठिकाणांची माहितीही दिली आहे. प्रश्न उचलला नसता तर ही कारवाई झाली नसती, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

महावितरणने आता सुरू केलेली मोहीम केवळ दिखाऊ न राहता ती पूर्णत्वास जाणे गरजेचे आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित प्रश्नावर कोणतीही तडजोड होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पुढील पाच दिवसांत शहरातील प्रत्येक पोलवरील अनधिकृत वायर हटविल्या गेल्या तरच ही मोहीम यशस्वी ठरेल. अन्यथा पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण होईल.

दैनिक जनता आवाज यापुढेही या विषयाचा पाठपुरावा सुरू ठेवणार असून, प्रत्येक पोलवरील कारवाईवर लक्ष ठेवणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेपर्यंत हा आवाज थांबणार नसल्याची भूमिका दैनिकाने घेतली आहे.

### पाच दिवसांत सर्व वायर हटविणार

महावितरणचे अधिकारी वैभव कानडे यांनी सांगितले की, शहरातील सर्व वीज खांबांवरील अनधिकृत इंटरनेट व केबलच्या वायर हटविण्यात येणार आहेत. कोणताही दुजाभाव केला जाणार नाही. सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. आगामी पाच दिवसांत उर्वरित वायर हटविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

### सर्वांवर समान कारवाई होणार का?

महावितरणची मोहीम सुरू असतानाही काही ठिकाणी इंटरनेटच्या वायर अद्यापही कायम असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे काही पोलवरील वायर तातडीने हटवल्या जातात, तर काही ठिकाणी अजूनही कारवाई का नाही? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. सर्व इंटरनेट व केबल सेवा पुरवठादारांवर एकसमान कारवाई करून शहरातील प्रत्येक वीज खांब अनधिकृत वायरमुक्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## संमिश्र

### मान्सून ७ दिवसांत पुन्हा जोर धरणार

**नवी दिल्ली :** राजस्थान, गुजरात आणि वायव्य भारतातील काही भागांत गेल्या ३-४ दिवसांत मंदावलेला मान्सून २० जुलैपासून पुन्हा जोर धरण्याची शक्यता आहे. पूर्व, मध्य आणि ईशान्य भारतावर दाट ढगांचे आच्छादन असल्याचे दिसून येत आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, बांगलादेश आणि ईशान्य भारतावर तयार होत असलेली चक्रीवादळाची प्रणाली (सायक्लोनिक सिस्टीम) आणि वेस्टर्न डिस्टर्बन्स (पश्चिमेकडील विक्षोभ) यांच्या प्रभावामुळे पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार आहे. दरम्यान, पुढील ६-७ दिवसांत उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, ईशान्येकडील राज्ये आणि पूर्व उत्तर प्रदेशातील अनेक ठिकाणी चांगला ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### महागाईचा वेग पुन्हा वाढला

**नवी दिल्ली :** देशातील किरकोळ महागाईचा वेग पुन्हा वाढला आहे. जूनमध्ये ती वाढून ४.३८% वर पोहोचली आहे, जी मे महिन्यात ३.९३% होती. सहा महिन्यांत पहिल्यांदाच किरकोळ महागाई रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ४% च्या लक्ष्यापेक्षा जास्त झाली आहे. २०२६ च्या सुरुवातीला महागाई दर खूप कमी होता. जानेवारीमध्ये तो २.७४% च्या पातळीवर होता, जो जूनपर्यंत वाढत ४.३८% वर पोहोचला आहे. गेल्या महिन्यात म्हणजेच एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यात किरकोळ महागाईत ०.४५% ची वाढ नोंदवली गेली आहे. महागाई वाढण्याचे मोठे कारण म्हणजे खाण्यापिण्याच्या वस्तूंच्या किमती वाढणे हे आहे.

### २.९३ कोटींचे खाद्यतेल जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** सेफ फूड-सेफ महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मोठी धडक कारवाई केली आहे. अत्यंत अस्वच्छ वातावरणात खाद्यतेलाचे रिपॅकिंग करणाऱ्या दोन मोठ्या कंपन्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, या ठिकाणाहून तब्बल २ कोटी ९३ लाख रुपयांचा संशयित निकृष्ट तेलाचा साठा जप्त करण्यात आला असून यामुळे खळबळ उडाली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे एफडीएच्या पथकाने जिल्ह्यातील दोन मोठ्या ऑइल रिपॅकिंग युनिट्सवर अचानक धाड टाकली.




# फडणवीसांचा मुख्यमंत्रीपदाचा विक्रम

## सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्यांमध्ये तिसरे स्थान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे आणखी एका नव्या विक्रमाची नोंद झाली आहे. राज्याच्या इतिहासात सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषवणाऱ्या नेत्यांच्या यादीत देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री शरद पवार यांना मागे टाकत तिसरे स्थान पटकावले आहे. १२ जुलै २०२६ पर्यंत फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ २,४३० दिवसांचा (सुमारे ६ वर्षे ७ महिने) झाला असून, त्यांचा हा कार्यकाळ अद्यापही सुरू आहे.

देवेंद्र फडणवीस हे आतापर्यंत तीन वेळा मुख्यमंत्री झाले आहेत. (पान ४ वर)

### राजकारणात फडणवीसांची नवी नोंद

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तीन कार्यकाळांचा प्रवास वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. २०१४ ते २०१९ या काळात त्यांनी सलग पाच वर्षांचा पूर्ण कार्यकाळ पूर्ण केला. २०१९ मधील दुसरा कार्यकाळ हा राज्याच्या इतिहासातील सर्वात अल्प, अवघ्या सहा दिवसांचा (सुमारे ८० तास) ठरला. त्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये त्यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची धुरा स्वीकारली असून १२ जुलै २०२६ पर्यंत या कार्यकाळाला ५८५ दिवस पूर्ण झाले आहेत.

# पंढरीच्या वाटेवर काळाचा घाला

## जेजुरीत भीषण अपघात; ३ भाविकांचा मृत्यू, ४ जखमी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांवर आज सकाळी मोठा अनर्थ ओढावला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासोबत पायी चालत निघालेल्या वारकऱ्यांना जेजुरी परिसरातील भोंगळे मळा येथे एका भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाला असून, चार वारकरी गंभीर जखमी झाले आहेत.

(पान ४ वर)




### जखमींसाठी पवारांची प्रार्थना

दिंडीदरम्यान झालेल्या अपघातात तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दुःख व्यक्त केले आहे. मृत वारकरी भगिनींना श्रद्धांजली वाहत त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याची भावना व्यक्त केली. जखमी वारकरी भगिनींना लवकर बरे वाटावे, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.

# गुन्हेगारीविरोधात श्रीरामपूर एकवटले

## आमदार हेमंत ओगले यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांची प्रशासनावर टीका



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैया यांच्या भरदिवसा झालेल्या हत्येनंतर श्रीरामपूरमधील जनक्षोभ आणखी तीव्र झाला आहे. या घटनेच्या निषेधार्थ सलग दुसऱ्या दिवशीही शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. व्यापारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. शहरातील वाढत्या गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करत आंदोलकांनी पोलिस प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

**दुसऱ्या दिवशीही बंद कायम**

**मकोका कारवाई करण्याची मागणी**

महात्मा गांधी चौकात झालेल्या आंदोलनात आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, माजी खासदार सदाशिव (पान ४ वर)

# महामंडळ नियुक्त्यांचा मुहूर्त ठरला?

## भाजप ४८, शिंदे सेनेला २९, राष्ट्रवादीला २२ टक्के वाटा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महायुती सरकारमधील रखडलेल्या महामंडळे आणि विविध शासकीय संस्थांवरील नियुक्त्यांबाबत अखेर मोठी हालचाल झाल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाला असून, लवकरच अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्त्या जाहीर होण्याची शक्यता आहे.

महायुती सरकार स्थापन होऊन अनेक महिने उलटूनही विविध महामंडळांवरील नियुक्त्या झाल्या नव्हत्या. (पान ४ वर)

### मित्रपक्षांमध्ये नाराजीची शक्यता

महायुतीतील इतर घटक पक्षांच्या वाट्याला केवळ १ टक्का हिस्सा आल्याने त्यांच्यात नाराजी निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, दुसरीकडे अनेक महिन्यांपासून रखडलेल्या नियुक्त्यांचा मार्ग मोकळा झाल्याने महायुतीतील इच्छुक पदाधिकाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असल्याचे बोलले जात आहे. या फॉर्म्युल्याला अधिकृत मंजुरी मिळाल्यानंतर विविध महामंडळांवरील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्त्यांची घोषणा टप्प्याटप्प्याने होण्याची शक्यता आहे.

# सावळीविहीर जंक्शनवरील कोंडी हटणार

## डॉ. विखे पाटील; गुरुपौर्णिमेपूर्वी वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासनाची तयारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** अहिल्यानगर - मनमाड महामार्गावरील सावळीविहीर जंक्शन येथे सुरू असलेल्या रस्ते व उड्डाणपुलाच्या कामामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी पुढील तीन दिवसांत मोठ्या प्रमाणात दूर केली जाईल. त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित ठेकेदार, पोलीस प्रशासन आणि परिसरातील ग्रामस्थ यांच्या संयुक्त बैठकीत सविस्तर कृती आराखडा निश्चित करण्यात आला असून, गुरुपौर्णिमेपूर्वी रस्त्याची एक बाजू पूर्ण करून वाहतुकीसाठी खुली केली जाईल, अशी माहिती भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.



> संबंधित ठेकेदाराची नियुक्ती केंद्र शासनाने केली आहे. तो कोणाचाही नातेवाईक किंवा ओळखीचा व्यक्ती नसून, त्याच्याकडून दर्जेदार काम करून घेणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. कामात त्रुटी आढळल्यास त्या निश्चितपणे दुरुस्त केल्या जातील. मात्र अधिकारी आणि ठेकेदारांशी अरेरावी करून प्रश्न सुटणार नाहीत. उलट ठेकेदाराने काम सोडले तर प्रकल्प आणखी विलंबित होईल, याचाही विचार नागरिकांनी करणे आवश्यक आहे.
>
> **- डॉ. सुजय विखे पाटील**

सावळीविहीर येथे नगर - मनमाड महामार्गाचे काम आणि राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाचे काम एकाच ठिकाणी सुरू असल्याने वाहतुकीवर दुहेरी ताण आला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. विखे पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नाशिक विभागातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, नगर विभागाचे अधिकारी, (पान ४ वर)

# लाडकी बहीणमधून ९२ लाख महिला अपात्र?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चावर कॅगने ताशेरे ओढल्यानंतर आणि योजनेतून तब्बल ९२ लाख महिलांना वगळण्यात आल्याच्या चर्चेने राज्यात मोठी खळबळ उडाली होती. विशेषतः बीड जिल्ह्यातील अपात्र महिलांच्या आकडेवारीवरून राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाला होता. या सर्व घडामोडींवर आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.




अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, ऑगस्ट २०२५ पासून या योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. यासाठी महिलांना तब्बल ६ महिन्यांची मुदत देण्यात आली होती, तर त्रुटी दूर करण्यासाठी एप्रिलपर्यंतचा वेळ देण्यात आला होता. वारंवार संधी देऊनही अनेक महिलांनी या प्रक्रियेची पूर्तता न (पान ४ वर)

# वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठलभक्ती

## आ. संग्राम जगताप; केमिस्ट असोसिएशनकडून; हजारो वारकऱ्यांना मोफत औषधांचे वाटप




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, श्रद्धेची आणि समतेची महान परंपरा आहे. हजारो वारकरी अनेक किलोमीटरचा पायी प्रवास करत विठ्ठलाच्या दर्शनासाठी जातात. या प्रवासात त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रत्येक समाजघटकाची जबाबदारी आहे. अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने अनेक वर्षांपासून सातत्याने राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. तर पालकमंत्री आरोग्य सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून यामध्ये आनखी भर पडली आहे. वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात विठ्ठलाची सेवा असून, अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण होत असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे पायी निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध सामाजिक संस्था पुढे सरसावत असताना, पालकमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष व अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने आदर्शवत उपक्रम राबविला. शहरात मुक्कामी आलेल्या संत निवृत्तीनाथ महाराज पालखी दिंडीतील वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला.

या आरोग्यसेवा उपक्रमाचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक दत्ता गाडळकर, उपाध्यक्ष भरत सुपेकर, खजिनदार मनोज खेडकर, अमित महाराज धाडगे, सागर फुलसौंदर, अवधूत बोरुडे, संजय गुगळे, डॉ. विनय शहा, संभाजी काकडे, प्रेमकुमार तावरे, शिरीष बारस्कर, विनीत पोकळे, अजित तांबे, ज्ञानदेव यादव, श्रीराज सुपेकर, युवराज गुंजाळ, विकी दुल्लम, महेश म्हस्के यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी उपक्रमाला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधत त्यांना औषधांचे वाटप केले आणि अशा सेवाभावी उपक्रमांमुळे वारीची परंपरा अधिक समृद्ध होत असल्याचे सांगितले.

केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक दत्ता गाडळकर म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम अखंडपणे सुरू असून, प्रत्येक वर्षी हजारो वारकरी त्याचा लाभ घेत आहेत. सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवा देणे हीच आमच्या असोसिएशनची परंपरा आहे. भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात अशा सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

> आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य आम्हाला दरवर्षी लाभते. अनेक वारकरी सलग पायी प्रवास करत असल्याने त्यांना किरकोळ आरोग्य समस्या उद्भवतात. अशा वेळी त्वरित औषधे आणि प्राथमिक उपचार उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे.
>
> **– दत्ता गाडळकर, नगरसेवक**

# 'अमृतवाहिनी'त ऑनलाइन प्राध्यापक प्रशिक्षण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथील संगणक अभियांत्रिकी विभागामार्फत आयएसटीई-बिएनवाय, एआय पावर्ड डिजिटल टूल्स फॉर टिचिंग अँड रिसर्च स्किल या विषयावरील एक आठवड्याचा राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम दि. १५ ते २१ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून १,२५,००० चे अनुदान महाविद्यालयास मंजूर झाले असून, देशभरातील प्राध्यापक आणि संशोधकांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमात भारतातील १० विविध राज्यांमधील प्राध्यापक, संशोधक व उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक सहभागी होणार असून, यामुळे राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील ज्ञानाची देवाणघेवाण होणार आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर यांनी दिली. कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ दि. १५ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता ऑनलाइन माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी डॉ. प्रतापसिंह देसाई, डॉ. रावसाहेब लटपटे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे हे मान्यवर अतिथी म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. एआय आधारित राष्ट्रीय प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महसूल मंत्री मा. आ. बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीरजी तांबे, शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडेमिक्स डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे तसेच सर्व विभाग प्रमुख यांनी आयोजन समितीचे अभिनंदन केले.

# संत शेख महंमद महाराजांची पालखी उद्या पंढरीकडे



### पादुकांच्या भेटीचा भावस्पर्शी सोहळा

पंढरपूर येथे पोहोचल्यानंतर संत शेख महंमद महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांची पारंपरिक भेट होणार आहे. वारकरी संप्रदायातील हा अत्यंत भावपूर्ण आणि आध्यात्मिक क्षण मानला जातो. या सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी भाविकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : ग्रामदैवत सद्गुरू संत शेख महंमद महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे बुधवारी (दि. १५) सकाळी ८ वाजता श्रीगोंदा येथून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. सलग चौथ्या वर्षी निघणाऱ्या या पालखी सोहळ्यात तालुक्यासह राज्यभरातील हजारो वारकरी सहभागी होणार असून, सोहळ्याच्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे.

यंदाच्या पालखी सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाला खांदा देणारी मानाची बैलजोडी संत शेख महंमद महाराजांच्या पालखीतही सहभागी होणार आहे. या बैलजोडीचे मानकरी कृषी अधिकारी संदीप बोदगे यांना सलग चौथ्या वर्षी हा मान मिळाला आहे.

पालखी श्रीगोंदा शहरातील साळवनदेवी मार्गाने शेडगाव, खेड, भिगवण, पळसदेव, बावडा, खंडाळी, इंदापूर आणि तोंडले येथे मुक्काम करत पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. मार्गावरील प्रत्येक मुक्कामस्थळी वारकऱ्यांसाठी निवास, भोजन, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती पालखी सोहळा समितीने दिली. पालखी सोहळ्यात अधिकाधिक वारकरी आणि भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पालखी सोहळा समितीने केले आहे.

# पर्यावरण संवर्धनात कर्जतची राज्यभर छाप

## सर्व सामाजिक संघटनाला छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार जाहीर




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : पर्यावरण संवर्धन, लोकसहभाग आणि अविरत श्रमदानाच्या बळावर कर्जतचे नाव पुन्हा एकदा राज्याच्या नकाशावर झळकले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार २०२४ कर्जत येथील सर्व सामाजिक संघटना या संस्थेला जाहीर झाला आहे. सेवाभावी संस्था (राज्यस्तर) या गटामध्ये संघटनेने संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावत कर्जतच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

राज्यस्तरीय मूल्यांकन समितीने पर्यावरण संवर्धन, मोठ्या प्रमाणावर केलेले वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनातील सातत्यपूर्ण कार्य आणि समाजाच्या व्यापक लोकसहभागाची दखल घेत हा मानाचा पुरस्कार जाहीर केला आहे.

पुरस्काराची घोषणा होताच कर्जतमध्ये संघटनेच्या सर्व शिलेदारांनी एकत्र येत जल्लोष साजरा केला. पेढे वाटून, टाळ्यांच्या कडकडाटात आणि पर्यावरण संवर्धनाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. अनेक वर्षांच्या निस्वार्थ परिश्रमाला राज्य शासनाकडून मिळालेली ही मोठी पावती असल्याची भावना सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

हरित कर्जतचा संकल्प उराशी बाळगून सर्व सामाजिक संघटना गेल्या २१०० हून अधिक दिवसांपासून अखंड श्रमदान करत आहे. केवळ वृक्षारोपण न करता हजारो वृक्षांचे संगोपन, संरक्षण आणि संवर्धन करून ते जगविण्याचे कठीण कार्य संघटनेच्या शिलेदारांनी सातत्याने केले आहे. पर्यावरण संवर्धनासाठीची ही निष्ठा आणि समर्पित कार्याचीच राज्य शासनाने दखल घेत हा सर्वोच्च सन्मान बहाल केला आहे.

राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर संपूर्ण कर्जत तालुक्यातून तसेच विविध सामाजिक क्षेत्रांतून सर्व सामाजिक संघटनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आ. जगतापांमुळे केडगावचा विकास

## नगरसेवक मनोज कोतकर; सिमेंट कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : पुणे रोड ते स्नेहांकुर संस्थेपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण व डांबरीकरणाची मागणी स्नेहांकुर संस्थेकडून गेल्या चार ते पाच वर्षांपासून सातत्याने करण्यात येत होती. आ. संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे या रस्त्यासाठी भरीव निधी मंजूर झाला असून, आज या महत्त्वपूर्ण विकासकामाचा शुभारंभ होत असल्याचे नगरसेवक मनोज कोतकर यांनी स्पष्ट केले.

केडगाव प्रभाग क्रमांक १७ मधील पुणे हायवे ते स्नेहांकुर संस्थेपर्यंतच्या बहुप्रतीक्षित रस्त्याच्या सिमेंट कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. नगरसेवक जालिंदर कोतकर यांनी केडगावच्या सर्वांगीन विकासासाठी सर्व नगरसेवक एकदिलाने कार्यरत असून, प्रभागातील प्रत्येक प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.

स्नेहांकुर संस्थेत जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून नागरिक येत असल्याने या परिसरातील रस्त्याची दुरवस्था शहराच्या प्रतिमेला बाधा ठरत होती. ही बाब आ. जगताप यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आता हा रस्ता दर्जेदार स्वरूपात विकसित होणार असून, नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. स्नेहांकुर संस्थेच्या माध्यमातून रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसर अधिक हिरवागार, स्वच्छ आणि आकर्षक होईल. बाहेरून येणाऱ्या नागरिकांना अहिल्यानगर शहराची सकारात्मक आणि सुशोभित प्रतिमा पाहायला मिळेल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, उद्योजक जालिंदर कोतकर, उद्योजक सुमित लोंढे, उद्योजक सुजित काकडे, शरद ठुबे, केतन भंडारे, हितेश धागडे, स्नेहांकुर संस्थेचे संस्थापक,गिरीश कुलकर्णी, जया जोगदंड, डॉ. प्रीती भोंबे, बाळासाहेब वारुळे, रूपाली मुनोत, दिपाली बोरुडे, लखन चव्हाण, आशाबाई जोमेवाळे यांच्यासह स्नेहांकुर संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> केडगावच्या विकासासाठी आ. जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून, त्यांच्या माध्यमातून आणखी मोठा विकासनिधी आणून केडगावला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहे.
>
> **– मनोज कोतकर, नगरसेवक**

# वारकऱ्यांसाठी रेनकोटसह अल्पोपहाराचे वाटप

## आषाढी वारीत धनकवडीच्या भजनी मंडळाचा उपक्रम



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : आषाढी वारीनिमित्त धनकवडी येथील श्री सद्गुरु शंकर महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. धनकवडी परिसरात मुक्कामी असलेल्या विविध जिल्ह्यांतील दिंडीतील वारकरी भाविकांना मंडळाच्या वतीने रेनकोट आणि अल्पोपहार वाटप करण्यात आले.

अविरत पडणाऱ्या पावसात पायी वारी करणाऱ्या वारकरी भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, या सेवाभावी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेकडो वारकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेत भजनी मंडळाच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी भजनी मंडळाचे अध्यक्ष निखिल वाघमारे, चिन्मय भदे, विठ्ठल चव्हाण, गणेश कपिलेश्वर, गौरव आढागळे, तुषार राजपूत, आर्यवीर चव्हाण, सूरज बांदल, हॉटेल उद्योजक अमित शेट्टी, संदीप तरे, धीरज परदेशी यांच्यासह भजनी मंडळाचे सर्व सदस्य, गुरुबंधू आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसारच करिअरची दिशा ठरवा

## आ. मोनिका राजळे; आदि फाउंडेशनकडून यशस्वी अधिकाऱ्यांचा गौरव सोहळा




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : विद्यार्थ्यांनी करिअरची निवड करताना स्वतःची आवड, क्षमता आणि कौशल्य यांना प्राधान्य द्यावे. पालकांनी आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांवर लादण्याऐवजी त्यांच्या गुणांना आणि कलाला योग्य दिशा देऊन प्रोत्साहन द्यावे. आजच्या बदलत्या काळात करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध असून प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर किंवा अभियंता व्हायलाच हवा, असा हट्ट पालकांनी धरू नये, असे प्रतिपादन आ. मोनिका राजळे यांनी केले.

पाथर्डी येथील आप्पासाहेब राजळे सभागृहात आदि फाउंडेशनच्या वतीने तालुक्यातील इयत्ता दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या अधिकाऱ्यांचा गुणगौरव व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, मुख्याधिकारी संतोष लांडगे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, डॉ. मृत्युंजय गर्जे, अशोक चोरमले, सुभाष बोरुडे, संजय देशमुख, प्रतिक नांगरे, मनिषा उदमले, प्रा. अजय भंडारी, मुकुंद लोहिया, अंकुश कासोळे, बंडू पठाडे, नारायण पालवे, सचिन वायकर, काशीबाई गोल्हार, स्मिता लाड, सुनिल ओव्हळ, रमेश हांडाळ, महादेव जायभाय, भगवान साठे, मल्हारी खेडकर, बबलू खोर्दे, हर्षद गर्जे, प्राचार्य राजधर टेमकर आदी मान्यवर उपस्थित होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी प्रामाणिकपणा, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास आवश्यक असल्याचे सांगितले. स्वतःची आवड ओळखून ध्येय निश्चित करणे महत्त्वाचे असून आज इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जगभरातील ज्ञान एका क्लिकवर उपलब्ध आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता अभ्यास आणि ज्ञानवृद्धीसाठी करावा, असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास नियोजनबद्ध पद्धतीने करण्याची गरज अधोरेखित केली. अधिक पुस्तके वाचण्यापेक्षा दर्जेदार आणि प्रमाणित संदर्भग्रंथांचा अभ्यास केल्यास अधिक चांगले यश मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले, तर सूत्रसंचालन राजीव सुरवसे यांनी केले.

> कला, क्रीडा, कृषी, उद्योजकता, तंत्रज्ञान, संशोधन, संरक्षण, पत्रकारिता, प्रशासन, संगणक आणि डिझाइन यांसारख्या अनेक क्षेत्रांत विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांच्या मनातील स्वप्ने आणि क्षमता समजून घेणे ही पालकांची जबाबदारी आहे. समाजातील प्रतिष्ठेसाठी एखाद्या विशिष्ट क्षेत्राची सक्ती करण्याऐवजी विद्यार्थ्याला ज्या क्षेत्रात आनंद आणि आत्मविश्वास वाटतो, त्या क्षेत्रात शिक्षण घेण्यासाठी त्याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
>
> **– मोनिका राजळे, आमदार**

# सोनई-चांदा येथील सराईत गुन्हेगार हद्दपार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभाग असलेल्या सोनई व चांदा येथील दोघांवर जिल्हाबंदीची कठोर कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ अंतर्गत त्यांना अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांनी दिली.

सोनई येथील सौरभ उर्फ शेंग्या अशोक गजभिव (वय २३, रा. राजवाडा, सोनई) याच्याविरुद्ध मारामारी, घरफोडी, दंगा, दरोडा, गंभीर दुखापत, शिवीगाळ व धमकावणे अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. तर शिवतेज उर्फ अमोल शिवाजी जावळे (वय ३०, रा. पिंपळगाव रोड, चांदा) याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा, अवैध शस्त्र बाळगणे आणि फसवणूक यांसारखे गंभीर गुन्हे नोंद आहेत. शेवगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी प्रस्तावाची छाननी करून हद्दपारीची शिफारस केली. त्यानुसार सौरभ गजभिव याला दोन वर्षांसाठी, तर शिवतेज जावळे याला तीन महिन्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले. आदेशाची अंमलबजावणी करत सौरभ गजभिव याला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे, तर शिवतेज जावळे याला छत्रपती संभाजीनगर येथील त्याच्या नातेवाईकांकडे सोडण्यात आल्याची माहिती सोनई पोलिसांनी दिली.

# देवगड दर्शनाला जाणाऱ्या अंगणवाडी सेविकेचे अपहरण

## लोखंडी रॉडने मारहाण, सोन्याचे दागिने लुटले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : देवगड येथे दत्त दर्शनासाठी जाणाऱ्या गंगापूर तालुक्यातील एका ६३ वर्षीय वृद्ध महिला अंगणवाडी सेविकेला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने कारमध्ये बसवून तिचे अपहरण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आरोपीने दिवसभर कारमध्ये ओलीस ठेवून लोखंडी रॉडने बेदम मारहाण करत चाकूच्या धाकाने ९६ हजार ७०० रुपयांचे सोन्याचे दागिने व रोकड लुटली.

या घटनेने परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून, नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी गुन्हा दाखल होताच तात्काळ तपासाची सूत्रे हालवून मुख्य आरोपी अशोक भानुदास तांबे (रा. सलाबतपूर, ता. नेवासा) याला तत्काळ अटक केली आहे. ताराबाई रामचंद्र झिंजुर्डे (वय ६३, रा. शिंगी, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) या गुरुवारी (दि. ९ जुलै) देवगड फाट्यावर वाहनाची वाट पाहत असताना एका सिल्व्हर रंगाच्या कार चालकाने चला सोडतो म्हणून त्यांना बसवले. मात्र, कार देवगडकडे न नेता खलालपिंप्री मार्गे नेवासा, नगर, शनिशिंगणापूर, सोनई व ब्राम्हणी परिसरात फिरवली. एका निर्जन रस्त्यावर कार थांबवून आरोपीने लोखंडी रॉडने ताराबाई यांच्या डोक्यावर वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर चाकूचा धाक दाखवून ७ ग्रॅमची सोन्याची पोत (किंमत ५६ हजार), ५ ग्रॅमचे झुंबर (किंमत ४० हजार) आणि रोख ७०० रुपये लुटले. तसेच त्यांच्याच साडीने हात-पाय बांधून जिवे मारण्याची धमकी देत रात्री साडेनऊला हायवेवर सोडून दिले.

# नेवासेच्या विकासकामांत विरोधकांचा खोडा

## नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांचा गंभीर आरोप!




**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : ''नेवासा शहराचा विकास कोणत्याही परिस्थितीत थांबू देणार नाही. नगरपंचायतीत विरोधकांनी खोडा घातला, तर सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून निधी आणून कामे पूर्ण करू,'' असा ठाम निर्धार लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले व सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. जानेवारी २०२६ पासून जनतेने जबाबदारी दिल्याचे सांगत नगराध्यक्ष डॉ. घुले म्हणाले की, विरोधी नगरसेवक बाह्य शक्तींच्या प्रभावाखाली काम करत असून पाणीपुरवठा, भूमिगत गटारी, रस्ते, कचरा व्यवस्थापन या मूलभूत कामांना जाणीवपूर्वक विरोध करत आहेत.

बहुमताच्या जोरावर वित्तीय विषयांसह अनेक महत्त्वाचे ठराव फेटाळण्यात आले. खराब पाणीवाहिन्या व रस्ते दुरुस्तीच्या तातडीच्या कामांना, पाण्याच्या टाकीला तसेच धार्मिक स्थळांच्या कामांनाही विरोध करण्यात आला. सभेचे इतिवृत्त वेळेत न लिहिणे आणि अजेंडा अपूर्ण ठेवणे अशा प्रशासकीय ढिसाळपणावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच काही नगरसेवकांनी सभा लिपिकाला तयार मजकूर कॉपी-पेस्ट करण्यास सांगितल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

या पत्रकार परिषदेस महायुतीचे गटनेते महेश लोखंडे, नगरसेवक प्रवीण सरोदे, अंकुश म्हस्के, अनिल पवार, कृष्णा परदेशी, नगरसेविका मेघा सरकाळे तसेच भाऊसाहेब वाघ, संदीप सरकाळे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सभेपूर्वीच अजेंड्यावर बाहेरील व्यक्तींनी सोशल मीडियावर भाष्य करून कायदेशीर प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी कायदेशीर अभ्यास करून संबंधितांवर हक्कभंगाची कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देणार असल्याचे नगराध्यक्षांनी सांगितले.

### पालखी मुक्कामाची फरपट

३ जुलैच्या सभेत ठराव मंजूर होऊ न दिल्याने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पहिल्या मुक्कामाच्या नियोजनात अडचणी आल्या. त्यामुळे वारकऱ्यांची फरपट झाली आणि मुक्कामाचे ठिकाण बदलावे लागले, असा दुर्दैवी आरोपही सत्ताधाऱ्यांनी केला. दरम्यान, शहरातील शॉपिंग कॉम्प्लेक्स व पाणीपुरवठ्याची कामे लवकरच सुरू करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

# मुळीक यांनी केली प्रसादालयाची पाहणी

## श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने केला त्यांचा सन्मान




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक यांनी राज्यात प्रसिद्ध असलेल्या पारनेर तालुक्यातील निघोज येथील श्री मळगंगा देवीचे यथासांग दर्शन घेत, ट्रस्टचावतीने राबविण्यात येत असलेल्या हुशार व होत विद्यार्थ्यांसाठीच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि आलेले भाविक भक्त व ग्रामस्थांसाठी चालवलेल्या प्रसादालयाची पाहणी केली.

यावेळी त्यांनी दोन्ही ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा, व्यवस्थापन आणि सुरू असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती घेतली. या भेटी दरम्यान त्यांनी संबंधित उपक्रमांबाबत समाधान व्यक्त करत स्थानिक पातळीवर होत असलेल्या कार्याचे कौतुक केले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभ्यासिका, संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक साहित्य व अभ्यासाचे वातावरण याची त्यांनी पाहणी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन आणि अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा केंद्रांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यास मोठी मदत होईल, त्यातून मोठ मोठे अधिकारी तयार होतील, असा विश्वास ही मुळीक यांनी व्यक्त केला.

त्यानंतर विजय मुळीक यांनी प्रसादालयाला भेट देऊन तेथील स्वच्छता, भोजन व्यवस्था, बसण्याची सुविधा आणि एकूण व्यवस्थापनाची पाहणी केली. भाविकांना शिस्तबद्ध, स्वच्छ आणि दर्जेदार सेवा व तिही अवघ्या २० रुपयात देण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाचे त्यांनी कौतुक केले. समाजाच्या सहकार्याने आणि स्थानिक संस्थांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या या सुविधा इतरांसाठीही आदर्श ठरतील, असे त्यांनी सांगितले.

# नगरसेवक शेख यांच्या पाठपुराव्याला यश

## खालचीवेस येथील बारव स्वच्छतेच्या कामाला सुरुवात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : खालचीवेस परिसरातील पावन मारुती मंदिराजवळील ऐतिहासिक बारवेमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ व कचरा साचल्याने ती वापरण्यायोग्य राहिली नव्हती. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत नगरसेवक शेख रिजवान यांनी नगरपालिकेकडे लेखी निवेदन देऊन बारव तातडीने स्वच्छ करून पुन्हा वापरासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

नगरसेवक रिजवान शेख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत नगरपालिकेने तात्काळ कार्यवाही करत बारवेमधील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

या निर्णयामुळे खालचीवेस परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही बारव परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा पाणीस्रोत मानली जाते. दरवर्षी अनेक कुटुंबे या बारवेतील पाण्यावर अवलंबून असतात.

त्यामुळे बारव स्वच्छ करून ती पुन्हा वापरण्यायोग्य करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याबद्दल नागरिकांनी नगरसेवक शेख रिजवान यांचे अभिनंदन करत आभार व्यक्त केले आहेत.

# ब्राह्मण युवक समितीच्या अध्यक्षपदी उपाध्ये



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : राजस्थानी ब्राह्मण समाजातील युवकांना एकत्रित करुन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी उपक्रमांना अधिक बळ देणाऱ्या राजस्थानी ब्राह्मण उत्सव युवक समितीच्या आगामी वर्षासाठीच्या पदाधिकाऱ्यांची एकमुखाने निवड करण्यात आली असून, समितीच्या अध्यक्षपदी शुभम उपाध्ये यांची बिनविरोध निवड झाली आहे. समाजाच्या ऐतिहासिक परंपरेला आधुनिक व सामाजिक उपक्रमांची जोड देत युवकांना संघटित करण्याची जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीमुळे यंदाच्या भगवान श्री जगदीश जयंती उत्सवासह विविध समाजोपयोगी उपक्रमांना अधिक व्यापक स्वरुप प्राप्त होईल, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला आहे. संगमनेर आणि राजस्थानी ब्राह्मण समाजाचे नाते तब्बल तीन शतकांहून अधिक काळापासूनचे आहे. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी समाजाने कॅप्टन लक्ष्मी चौक परिसरात भगवान श्री जगदीश मंदिराची उभारणी केली. त्यानंतर जगन्नाथ पुरी येथे आषाढ शुद्ध द्वितीयेला निघणाऱ्या ऐतिहासिक रथयात्रेच्या परंपरेतून प्रेरणा घेत संगमनेरमध्येही दरवर्षी भव्य रथयात्रेची सुरुवात करण्यात आली. तेव्हापासून आजपर्यंत समाजाच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली मंदिरापासून निघणारी ही रथयात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरुन भक्तिमय वातावरणात वाजतगाजत काढली जाते आणि पुन्हा मंदिरात येऊन तिची सांगता होते.

# शेतकऱ्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला ; पाच जणांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील घुगलवडगाव येथे जुन्या राजकीय व भावकीच्या वादातून एका शेतकऱ्यावर धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला झाल्याची गंभीर घटना शनिवारी दुपारी ४ वाजता घडली. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घुगलवडगाव येथील रोहिदास हरिश्चंद्र दांगडे हे कांद्याच्या गोण्या घेऊन श्रीगोंदाहून मांडवगण रोडने घुगळवडगावकडे मोटारसायकलवरून परतत असताना गणपती मळ्यातील अमोल सुपेकर यांच्या वस्ती जवळ काही जणांनी त्यांचा पाठलाग केला.

आरोपींनी वेगवेगळ्या मोटारसायकलींवर येऊन त्यांची वाट अडविल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. जीवाच्या भीतीने रोहिदास दांगडे यांनी मोटारसायकल सोडून जवळील सुपेकर यांच्या घरात आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपींनी तेथेही पाठलाग करून तलवार व इतर धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर वार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही हातांना गंभीर दुखापत झाली असून डोके व तोंडालाही मार लागल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक घटनास्थळी पोहोचले.

जखमी अवस्थेत असलेल्या रोहिदास दांगडे यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे श्रीगोंद्यातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी राधिका रोहिदास दांगडे (वय १८, रा. घुगलवडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परशुराम सुभाष दांगडे, अभयराज संजय दांगडे, सागर ऊर्फ प्रदीप सुनील दांगडे, दत्तात्रय गोविंद दांगडे, विक्रम तुळशीराम दांगडे आणि संग्राम ऊर्फ तात्याराम ज्ञानदेव पवार (सर्व रा. घुगलवडगाव, ता. श्रीगोंदा) यांच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यातील एक आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहेत.

# लाभार्थ्यांनी तातडीने ई-केवायसी करून घ्यावी

## आमदार आशुतोष काळे यांचे आवाहन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजने अंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थ्यांनी शासनाच्या निर्देशानुसार तातडीने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

शासनाने लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत ठेवणे, योजनांमध्ये पारदर्शकता आणणे तसेच पात्र लाभार्थ्यांना नियमित व विनाअडथळा योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य केली आहे. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांनी अद्याप ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांनी कोणतीही दिरंगाई न करता ही प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे. ई-केवायसीसाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक तसेच आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या सेतू सुविधा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, तहसील कार्यालय किंवा संबंधित शासकीय कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध सुविधांचाही लाभ घ्यावा. ३० जुलैच्या आत ई-केवायसी न केल्यास लाभार्थ्यांचे अनुदान किंवा निवृत्तीवेतन वितरणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, निराधार महिला, विधवा, दिव्यांग तसेच गरजू लाभार्थ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य द्यावे. कोणत्याही चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवता शासनाने दिलेल्या सूचनांनुसार ई-केवायसी पूर्ण करावी असे आमदार काळे यांनी नमूद केले.

# दंडकारण्य अभियानांतर्गत वृक्ष लागवड करा

## माजी आ.डॉ.सुधीर तांबे; वृक्ष संगोपन हीच खरी सेवा



### वनश्री पुरस्काराबद्दल मालदाडचा गौरव

मालदाड गावचे सर्व ग्रामस्थ व सरपंच यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व तळमळीने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व संवर्धन केले. हा पॅटर्न आदर्शवत ठरला आहे. वृक्षारोपणामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी मिळाली या अंतर्गत ६० लाख रुपयांचा रोजगार गावामध्ये निर्माण झाला. याचबरोबर १४ एकरवर वृक्षरोपण केल्यातून शेवगा, आंबा यामधून गावाला मोठे उत्पन्नही मिळाले या कामाची दखल घेऊन त्यांना वनश्री पुरस्कार मिळाला याबद्दल सरपंच गोरख नवले यांचा माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : ग्लोबल वार्मिंगची समस्या, कमी पाऊस, वाढलेली उष्णता. दुष्काळ या सर्व समस्यावर मात करण्यासाठी पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. यावर्षी दंडकारण्य अभियानांतर्गत जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करा वृक्षारोपण व संवर्धन हीच खरी मानवतेची व ईश्वराची सेवा ठरणार असल्याचे दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर दंडकारण्य अभियानाच्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, प्रकल्प प्रमुख सौ. दुर्गाताई तांबे, सभापती शंकरराव खेमनर, सरपंच सोमनाथ गोडसे, गोरख नवले, गोरख सोनवणे, सुभाष सानप, योगेश पवार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, आदिवासी सेवक प्रा.बाबा खरात, समन्वयक प्राचार्य दशरथ वर्पे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. माजी आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जात असलेले दंडकारण्य अभियान ही पर्यावरण संवर्धनाची मोठी लोकचळवळ ठरली आहे. वृक्षारोपण व संवर्धन ही मानवतेची गरज आहे आणि खऱ्या अर्थाने यामधून परमेश्वराची सेवा होणार आहे म्हणून या पावसाळ्यामध्ये प्रत्येकाने जास्तीत जास्त वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करा.

या अभियाना मधून सप्तशृंगी गडावर १०० हेक्टर वर वृक्षारोपण करण्यात आले असून अनेक वृक्ष जगले आहेत. दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, तालुक्यातील सहकारी संस्थांच्या मदतीने वृक्षारोपण व संवर्धनाचे मोठे काम झाले आहे. मात्र अनेक ठिकाणी वनवे लावले जात आहे हे अत्यंत चिंताजनक आहे यावर्षीचा उन्हाळा भयानक होता जास्त उन्हामुळे झाडे करपले गेली तरीही अनेक झाडांना पाणी देऊन ते जगविण्यात आली.

उन्हाळ्यामध्ये झाडे जगवणे अवघड असून शेतकऱ्यांनी आपल्या जवळील मोकळ्या जागेत वृक्षारोपण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# कोल्हारमध्ये वारकरी दिंडीचे भक्तिभावाने स्वागत

## खर्डे परिवारातर्फे १,२०० वारकऱ्यांसाठी भोजन-निवासाची व्यवस्था



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : आषाढी वारीनिमित्त शिर्डी येथील ह.भ.प. महंत काशीकानंद महाराज यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या सुमारे १,२०० वारकऱ्यांच्या दिंडीचे कोल्हार येथे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांच्या परिवारातर्फे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी वारकऱ्यांसाठी भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली होती.

दीपक मंगल कार्यालयात वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली होती. गेल्या वीस वर्षांपासून खर्डे परिवार हा सेवाभावी उपक्रम सातत्याने राबवत असून, यंदाही दिंडीचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.

### सेवेची २० वर्षांची परंपरा कायम

यावेळी अनिल खर्डे, डॉ. सुनील खर्डे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा कीर्तनकार ह.भ.प. ओंकार महाराज यांच्या कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर वारकरी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

प्रसंगी ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी यंदा समाधानकारक पाऊस झाल्याबद्दल पांडुरंगाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आगामी काळातही निसर्गाची साथ लाभावी, शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा, समाजात सलोखा नांदावा आणि राज्य व देशाची प्रगती व्हावी, अशी प्रार्थना वारकऱ्यांनी करावी, असे आवाहन त्यांनी केले. पुढील वर्षी दिंडीच्या स्वागतासाठी अधिक सुविधायुक्त व्यवस्था उभारण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी दिंडी प्रशासनातर्फे ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील तसेच दीपक मंगल कार्यालयाचे दीपक घुले यांचा सन्मान करण्यात आला. वारकऱ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेत खर्डे परिवाराच्या सेवाभावी परंपरेचे कौतुक केले. विठ्ठलनामाच्या अखंड गजराने आणि वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाने कोल्हार परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

## संपादकीय

### धक्कादायक गैरप्रकार

राज्याराज्यांमध्ये राजकीय रण तापले असताना सध्या एका गैरकारभाराच्या प्रकरणानेही चांगलीच उचल खाल्ली आहे. या प्रकरणामुळे अवघा देश हादरला आहे. काही ताज्या सर्वेक्षणांमधून तर या प्रकरणाचा फटका भाजपला उत्तर प्रदेशच्या निवडणुकीमध्ये बसण्याचीही शक्यता  व्यक्त होत आहे. अयोध्येतील श्री राम जन्मभूमी मंदिरातील दानपेटीमध्ये भक्तांकडून आलेल्या देणग्या आणि दागदागिने अशा मौल्यावान वस्तुंच्या चोरी प्रकरणात मंदिरातील आठ सेवकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यायाचे सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य विश्वस्त अनिल मिश्र यांना राजीनामे देणे भाग पडले आहे. राममंदिरातील दानपेटीवर पडलेल्या दरोड्याची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी)ची नियुक्ती करण्यात आली आहे. अटक केलेल्या कर्मचाऱ्यांच्या घरी छापे टाकून आजवर ऐंशी लाखाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. सापडलेली रक्कम हे तर हिमनगाचे टोक असावे. देशभरातून रोज येणाऱ्या हजारो भक्तांकडून दानपेटीमध्ये देणग्यांचा वर्षाव होत असताना त्यावर हात मारण्याचे काम पैसे मोजणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून पध्दतशीर दीर्घ काळ चालू होते. राम मंदिरामध्ये सर्वत्र सीसीटीव्ही आहेत. रोख रक्कम मोजली जाते, तिथेही सीसीटीव्ही आहेत, पाचशे रूपयांच्या नोटा सतत कमी होत असल्याचे लक्षात येत होते, तरीही प्रभु रामाच्या नावावर लूटमार होत असल्याचे आजवर कुणाच्या लक्षात कसे आले नाही, हा खरा प्रश्न आहे. श्रीराम जन्मभमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट स्वायत्त आहे. अयोध्येत भव्य राम मंदिर उभारणीचे तसेच वित्त आणि प्रशासनवर देखरेख करण्याचे काम या ट्रस्टकडे सोपवण्यात आले होते. नोव्हेंबर २०२९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानंतर भव्य राम मंदिर उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. ५ फेब्रुवारी २०२० रोजी केंद्र सरकारने श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाची स्थापना केली. या ट्रस्टला सर्व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असून ट्रस्ट स्वायत्त असेल असे स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदींनीच संसदेत जाहीर केले. सरकारने अधिग्रहण केलेली जमीन या ट्रस्टकडे सोपवण्यात आली. या ट्रस्टवर एकूण पंधरा सदस्य आहेत. त्यापैकी बारा सदस्यांची नेमणूक सरकारने केली आहे. ट्रस्टचे एक सदस्य विलेंद्र मोहन प्रताप मिश्र यांचे ऑगस्ट २०२५ मध्ये निधन झाले. ते अयोध्येच्या राजघराण्याचे वंशज होते. के. परासरन हे ट्रस्टचे संस्थापक सदस्य सर्वोच्च न्यायलयातील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आहेत. त्यांनीच सर्वोच्च न्यायालयात राम जन्मभूमी वादात राम लल्लाचा जन्म तिथेच झाला होता अशी बाजू मांडली होती. महंत नृत्य गोपाल दास हे राम जन्मभूमी तसेच श्रीकृष्ण जन्मभूमी न्यायाचे अध्यक्ष असून अयोध्येतील छोटी छावणीचे पीठाधीश्वर आहेत.

श्री. चंपत राय हे विश्व हिंदू परिषदेचे उपाध्यक्ष आहेत. रामजन्मभूमी ट्रस्टचे सरचिटणीसही आहेत. मंदिरातील दैनंदिन प्रशासन संभाळणे, सार्वजनिक कामांवर तसेच मंदिर उभारणीवर देखरेख ठेवणे हे त्यांचे काम आहे. स्वामी गोविंद देवगिरी महाराज हे प्रमुख अध्यात्मिक गुरू आहेत. ते ट्रस्टचे कोषाध्यक्ष आहेत. ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांवर देखरेख ठेवणे हे त्यांचे काम आहे. नृपेंद्र मिश्र हे मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष आहेत. ते निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. २०१४ ते २०१९ या काळात ते पंतप्रधानांचे सचिव होते. डॉ. अनिल मिश्र हे होमिओपॅथिक डॉक्टर आहेत. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आहेत.  ट्रस्टचे निर्णय घेण्यात त्यांची महत्वाची भूमिका असते. याखेरीज अयोध्येचे जिल्हाधिकारी शशांक त्रिपाठी, आयएएस अधिकारी संजय प्रसाद आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त सचिव प्रशांत लोखंडे, परमानंद गिरी, अयोध्या निर्मोही आखाड्याचे प्रतिनिधी दिनेंद्र दास, बद्रीनाथ येथील ज्योतिष पीठाचे शंकराचार्य स्वामी वासुदेवानंद सरस्वती, उडपी येथील श्री पेजावर अधोक्षज मठाचे पीठाधीश्वर स्वामी विश्व प्रसन्न तीर्थ असे धार्मिक, अध्यात्मिक आणि प्रशासनीक क्षेत्रातील मान्यवर लोक श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टवर विश्वस्त म्हणून काम करत असताना राम मंदिरातील दानपेटीवर रोज लूटमार चालू कशी राहिली, असा प्रश्न पडतो. राम मंदिर परिसरात ३५ दान पेट्या आहेत. दान केलेल्या रकमेची मोजणी करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडे अधिकृत जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या कामात एका बाहेरच्या खाजगी कंपनीलाही सहभागी करून घेण्यात आले आहे. देणग्या मोजण्यासाठी ट्रस्टकडे पन्नास कर्मचारी आहेत. त्यावर ट्रस्टचे १२ कर्मचारी देखरेख करत असतात. बँकेकडे रक्कम सोपवण्याअगोदर नोटांची बंडले करण्याचे काम कर्मचारी करत असतात. तिथे सीसीटीव्हीही आहेत. शिवाय मंदिरात ट्रस्टचे १५०० कर्मचारी काम करत असतात. सध्या देणग्यांमध्ये झालेला अपहार शोधून काढण्याचे काम चालू आहे. ऐंशी लाख वसूल झाले असले तरी एका अंदाजानुसार हा किमान २०० कोटी रुपयांचा घपला असावा. येथिल अठरा ते वीस हजार वेतन मिळवणारे कर्मचारी गेल्या वर्षात मालामाल कसे झाले, त्यांची संपत्ती कशी वेगाने वाढली, त्यांनी मोठ्या मालमत्ता कशा खरेदी केल्या आणि त्यासाठी पैसे कुठून आणले याचा शोध घेणे गरजेचे आहे. विश्वस्तांचे काही नातेवाईक मोक्याच्या ठिकाणी कर्मचारी म्हणून  कसे काम करतात हा सुध्दा तपासाचा मुद्दा आहे. मंदिरात काम करणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांची संपूर्ण नावे, त्यांच्या वडिलांचे नाव किंवा पूर्ण निवासी पत्ता यांची ट्रस्टकडे नोंदच नाही. येणाऱ्या देणग्यांची अचूक नोंद ठेवण्याची पध्दतच नाही. गेल्या अकरा महिन्यांमध्ये ट्रस्टकडे वेगवेगळ्या माध्यमातून ८३ कोटी रुपये जमा झाले आहेत. पैकी  ५५ कोटी रुपये दानपेटीतून जमा झाले आहेत. मंदिराकडे जमा होणारे सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती यांचा हिशेब कुठे आहे, त्यातले किती दागिने गायब झाले वा चोरीला गेले हा ही प्रश्नच आहे. राम मंदिरासाठी देशातील सर्व भागातून श्रध्दाळू भक्तांनी चांदीच्या वीटा पाठवल्या होत्या, अशा किती विटा आल्या, कुठे ठेवल्या व हिशेब कुठे आहे, असेही प्रश्न आत्ता उपस्थित होत आहेत. निवडणुकीमध्ये मतांसाठी भाजपाने राम मंदिराचा प्रचार केला. रामाच्या नावावर मते मागितली. मंदिरातील चोरांना आता 'चंदा चोर' म्हणून हिणवले जात आहे. शिवसेनेने मंदीर उभारणीसाठी एक कोटी रुपयांची देणगी दिली होती, तिचा वापर झाला की नाही, हे ठाऊक नाही. एकंदरीत, राम मंदिरात जे काही चालले आहे ते भंयकर आहे

# सोमधाराचा सांगावा

पर्यावरण

– मिलद बेंडाळे,
पर्यावरण अभ्यासक



सोमधाराची शांतता आजही तशीच आहे; परंतु त्या शांततेत एक संदेश दडला आहे. निसर्ग आपल्याला सर्व काही देतो; पण किंमत ओळखली नाही, तर तो आपल्याला मर्यादांची जाणीव करून देतो. हिमालयातील या दुर्गम प्रदेशाकडे पाहताना केवळ सौंदर्याची स्तुती न करता या प्रदेशाच्या संरक्षणाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. कारण पर्वतांचे भविष्य आणि आपले भविष्य वेगळे नाही, तर एकमेकांशी घट्ट जोडलेले आहे.

हिमालयाकडे पाहण्याची आपली सवय बहुतेक वेळा त्याच्या उंचीच्या, भव्यतेच्या किंवा पर्यटनाच्या संदर्भातून तयार झालेली असते. जगातील सर्वोच्च पर्वतरांगा, साहसी मोहिमा, हिमाच्छादित शिखरे आणि धार्मिक यात्रांचे मार्ग यातून हिमालयाची ओळख अनेक स्तरांवर उलगडत जाते; मात्र या विशाल पर्वतराजीत काही ठिकाणे अशी आहेत, जी प्रसिद्धीच्या झोतात नसतात; पण त्यांचे अस्तित्वच आपल्याला निसर्ग, इतिहास आणि मानवी संस्कृतीबद्दल नव्याने विचार करायला भाग पाडते. उत्तराखंडच्या कुमाऊं हिमालयातील सोमधारा हा असाच एक प्रदेश आहे. भारत-तिबेट सीमेजवळ वसलेला हा उंच पर्वतीय भाग केवळ भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर हिमालयाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणीय वारशाचे प्रतीक मानला जाऊ शकतो. आज जेव्हा विकास, हवामानबदल आणि नैसर्गिक संसाधनांच्या वापराबाबत जागतिक स्तरावर चर्चा सुरू असताना सोमधारासारख्या प्रदेशांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक आणि संवेदनशील असणे आवश्यक आहे. सोमधारा हे नावच आपल्या कल्पनाशक्तीला स्पर्श करणारे आहे. 'सोम' म्हणजे चंद्र आणि 'धारा' म्हणजे प्रवाह. या नावातच शीतलता, शांतता आणि जीवनदायी ऊर्जा दडली आहे. हिमालयाच्या उंच शिखरांमधून उगम पावणाऱ्या जलप्रवाहांप्रमाणेच या प्रदेशाचे महत्त्वही दूरवर पसरले आहे. अनेकदा आपण नद्यांच्या प्रवाहाकडे पाहतो; पण त्या निर्माण करणाऱ्या हिमनद्या, पर्वत आणि जलसंकलन क्षेत्रांकडे दुर्लक्ष करतो. प्रत्यक्षात नदीच्या प्रत्येक थेंबामागे अशा पर्वतीय प्रदेशांचे मौन योगदान असते.

हिमालय हा केवळ भूभाग नाही, तर तो भारतीय उपखंडाच्या जलव्यवस्थेचा कणा आहे. गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा आणि असंख्य उपनद्या हिमालयातील हिमनद्यांमधून पोसल्या जातात. सोमधारासारख्या प्रदेशांतील बर्फ आणि हिमनद्यांमधून निर्माण होणारे पाणी पुढे अनेक नद्यांमध्ये मिसळते. या जलप्रवाहांवर शेती, जंगल, जैवविविधता आणि लाखो लोकांचे जीवन अवलंबून आहे. त्यामुळे अशा भागांचे महत्त्व केवळ स्थानिक नसून राष्ट्रीय स्तरावरील आहे. हिमालयाच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचे आध्यात्मिक स्थान. भारतीय परंपरेत पर्वतांना केवळ दगड-मातीचे समूह मानले गेले नाही, तर स्थैर्य, तपश्चर्या आणि उच्च चेतनेचे प्रतीक मानले गेले. ऋषी-मुनींनी हिमालयातील एकांत प्रदेशात साधना केली, अनेक तीर्थक्षेत्रे येथे विकसित झाली आणि निसर्गाशी एकरूप होण्याची संस्कृती निर्माण झाली. सोमधारासारख्या प्रदेशांबाबत लोकमानसात असलेली पवित्रतेची भावना याच परंपरेचा भाग आहे. या श्रद्धेचा सामाजिक परिणामही महत्त्वाचा आहे. ज्या प्रदेशाला लोक पवित्र मानतात, त्याचे संरक्षण करण्याची नैतिक जबाबदारी ते स्वतः स्वीकारतात. आधुनिक पर्यावरणशास्त्राने ज्या संवर्धनाच्या संकल्पना मांडल्या, त्यांची मुळे अनेकदा अशाच पारंपरिक श्रद्धांमध्ये सापडतात. नद्या माता आहेत, पर्वत देव आहेत आणि जंगल जीवनदायी आहेत, ही भावना अनेक शतकांपासून भारतीय समाजात अस्तित्वात आहे. त्यामुळे निसर्गाचे संरक्षण हे केवळ कायद्याचे नव्हे, तर संस्कृतीचेही कार्य बनते.

सोमधाराचा इतिहास खूप महत्त्वाचा आहे. आज जो प्रदेश अत्यंत दुर्गम वाटतो, तो एके काळी व्यापार, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि मानवी संपर्काचा मार्ग होता. हिमालयाकडे अनेकदा सीमा म्हणून पाहिले जाते; परंतु इतिहास सांगतो, की तो विविध संस्कृतींना जोडणारा पूलही होता. भारत आणि तिबेट यांदरम्यान शतकानुशतके व्यापार चालत होता. मीठ, लोकर, धान्य, रेशीम आणि इतर वस्तूंची देवाणघेवाण या मार्गांनी होत असे. भोटिया समाजासारख्या समुदायांनी या कठीण मार्गांवरून प्रवास करून आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध जिवंत ठेवले. या संपर्कातून धार्मिक कल्पना, लोकपरंपरा, भाषा आणि जीवनशैली यांचाही परस्पर प्रभाव वाढला. त्यामुळे हिमालय हा केवळ भू-राजकीय सीमा नसून सांस्कृतिक संवादाचा प्रदेश होता, हे विसरता कामा नये. ब्रिटिशकाळात हिमालयाचे महत्त्व आणखी एका कारणामुळे वाढले. साम्राज्यवादी शक्तींना भूगोल समजून घ्यायचा होता, नकाशे तयार करायचे होते आणि सीमांचे आकलन करायचे होते. या प्रक्रियेत भारतीय सर्वेक्षकांनी मोठी भूमिका बजावली. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत प्रवास करून दुर्गम प्रदेशांची माहिती गोळा केली. हिमालयातील अनेक भाग जगाच्या नकाशावर आणण्यात या प्रयत्नांचे मोठे योगदान आहे; परंतु इतिहास, अध्यात्म आणि भूगोल यांच्या पलीकडे जाऊन आज सर्वात गंभीर प्रश्न पर्यावरणाचा आहे. हवामानबदल हा आता भविष्यकाळातील धोका राहिलेला नाही, तर वर्तमानातील वास्तव बनला आहे.

आज हिमालयातील हिमनद्या वेगाने वितळत असल्याचे विविध अभ्यासांमधून समोर आले आहे. तापमानातील वाढ, पर्जन्यमानातील बदल आणि नैसर्गिक चक्रांमध्ये होणारे हस्तक्षेप यांचा परिणाम संपूर्ण पर्वतीय परिसंस्थेवर होत आहे. या बदलांचे परिणाम दूरगामी असू शकतात. सुरुवातीला हिमनद्या वितळल्याने पाण्याचे प्रमाण वाढल्यासारखे वाटू शकते; परंतु दीर्घकालीन दृष्टीने हिमसाठा कमी होणे म्हणजे भविष्यातील जलस्रोतांवर संकट येणे होय. भारतातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन नदीप्रणालींवर अवलंबून आहे. शेती, पिण्याचे पाणी, जलविद्युत प्रकल्प आणि औद्योगिक गरजा या सर्वांसाठी नदीचे अस्तित्व अत्यावश्यक आहे. त्यामुळे हिमालयातील बदलांचा परिणाम मैदानी भागांवरही होणार हे निश्चित आहे. या पार्श्वभूमीवर विकास आणि संवर्धन यांच्यातील संतुलनाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. सीमावर्ती आणि पर्वतीय प्रदेशांमध्ये पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. रस्ते, दळणवळण, आरोग्य आणि सुरक्षा या गरजांकडे दुर्लक्ष करता येणार नाही; परंतु विकासाची प्रक्रिया पर्यावरणाशी सुसंगत असली पाहिजे. अल्पकालीन आर्थिक फायद्यासाठी निसर्गाची अपरिवर्तनीय हानी करणे परवडणारे नाही. हिमालयातील अनेक भागांनी गेल्या काही वर्षांमध्ये अतिवृष्टी, भूस्खलन आणि पूर यांचे परिणाम अनुभवले आहेत. या घटनांमागे मानवी हस्तक्षेपाचाही वाटा असू शकतो. अनियोजित बांधकामे, जंगलतोड आणि पर्यावरणीय नियमांकडे दुर्लक्ष यामुळे पर्वतीय प्रदेशांची संवेदनशीलता वाढते. त्यामुळे विकासाच्या प्रत्येक निर्णयामध्ये पर्यावरणीय परिणामांचे गांभीर्याने मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

सोमधारासारख्या प्रदेशांचा विचार करताना आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो आपल्या निसर्गदृष्टीचा. आधुनिक जीवनशैलीने आपल्याला वेग, उपभोग आणि तात्काळ परिणाम यांची सवय लावली आहे. त्याउलट हिमालय आपल्याला संयम, स्थैर्य आणि दीर्घकालीन विचार शिकवतो. पर्वतांची निर्मिती लाखो वर्षांमध्ये होते. हिमनद्या हजारो वर्षांची स्मृती जपतात आणि नद्या शेकडो किलोमीटरचा प्रवास करून जीवन निर्माण करतात. या विशाल कालमानाच्या तुलनेत मानवी आयुष्य अत्यंत लहान आहे. म्हणूनच सोमधारा ही केवळ एक भौगोलिक जागा नाही. ती निसर्गाच्या सामर्थ्याचे, इतिहासाच्या सातत्याचे आणि मानवी जबाबदारीचे एक स्मरणपत्र आहे. ती आपल्याला सांगते की सभ्यता कितीही आधुनिक झाली, तरी तिचे अस्तित्व शेवटी पाणी, हवा, जंगल आणि पर्वत यांच्यावरच अवलंबून आहे. आज गरज आहे ती अशा प्रदेशांकडे केवळ पर्यटनस्थळ किंवा सीमावर्ती भूभाग म्हणून न पाहता, त्यांना राष्ट्रीय नैसर्गिक वारसा म्हणून जपण्याची. वैज्ञानिक संशोधन, स्थानिक समुदायांचा सहभाग, शाश्वत विकास धोरणे आणि पर्यावरणीय शिक्षण यांचा समन्वय साधल्याशिवाय हे शक्य होणार नाही. हिमालयाचे संरक्षण म्हणजे केवळ पर्वतांचे संरक्षण नाही, तर ते भविष्यातील पिढ्यांच्या जलसुरक्षेचे, पर्यावरणीय स्थैर्याचे आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आहे.

पान १ वरून

## फडणवीसांचा मुख्यमंत्रीपदाचा विक्रम

१२ जुलै २०२६ पर्यंत त्यांनी मुख्यमंत्रिपदाचे २,४३० दिवस पूर्ण केले आहेत. तर शरद पवार यांनी जुलै १९७८ मध्ये वयाच्या अवघ्या ३७व्या वर्षी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालेल्या शरद पवार यांनी चार वेळा या पदाची धुरा सांभाळली. मात्र, त्यांच्या नावावर एकूण २,४१२ दिवस इतका कार्यकाळ जमा आहे. विशेष म्हणजे शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री झाले, मात्र त्यांना एकदाही पूर्ण ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. दुसरीकडे, देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ असा सलग पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री राहण्याचा विक्रम जमा होत असतानाच, सर्वात कमी कालावधीसाठी मुख्यमंत्री राहण्याचा नकोसा विक्रमही त्यांच्याच नावावर आहे. देवेंद्र फडणवीस यांचा राजकारणातील प्रवास हा सामान्य कार्यकर्त्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी मानला जातो. २२ जुलै १९७० रोजी नागपूरमध्ये गंगाधर आणि सरिता फडणवीस यांच्या पोटी जन्म. त्यांच्या काकू शोभाताई फडणवीस ५ वेळा आमदार होत्या, तर वडीलही आमदार होते. घरातून आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून त्यांना समाजकारणाचे धडे मिळाले.अभाविपचे कार्यकर्ते आणि वॉर्डातील एका बूथवरील कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली.  १९९२ मध्ये नागपूर विद्यापीठातून कायद्याची पदवी पूर्ण केली. महाविद्यालयीन निवडणुकांपासूनच त्यांनी नेतृत्वगुणांना चालना दिली. १९९२ ते २००१ या काळात ते सलग नगरसेवक राहिले. याच काळात त्यांना नागपूरचे महापौरपद भूषवण्याची संधीही मिळाली. आपल्या अभ्यासपूर्ण आणि संयमी नेतृत्वाच्या जोरावर एकेकाळचा बूथ कार्यकर्ता आज राज्याच्या सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांच्या यादीत मानाच्या तिसऱ्या स्थानी जाऊन पोहोचला आहे.

## पंढरीच्या वाटेवर काळाचा घाला

सध्या राज्यभरातून लाखो वारकरी ऊन-पावसाची तमा न बाळगता पायी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवडचा मुक्काम आटोपून आज जेजुरीच्या दिशेने मार्गस्थ झाली होती. सकाळच्या वेळी अनेक वारकरी जेजुरीच्या दिशेने पायी चालत निघाले होते. या मार्गावर सुरक्षेच्या कारणास्तव एकाच बाजूने वाहने सोडली जात होती. प्राथमिक माहितीनुसार, जेजुरी नजीकच्या भोंगळे मळा परिसरात मागून आलेल्या एका भरधाव ट्रकने वारकऱ्यांच्या टेम्पोला आणि पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की यात तब्बल सहा वारकरी चिरडले गेले. अपघात घडताच परिसरातील नागरिक आणि इतर वारकऱ्यांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. जखमी झालेल्या सर्व सहा वारकऱ्यांना तातडीने नजीकच्या स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान यापैकी तीन महिला वारकऱ्यांचा उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर उर्वरित तीन जखमी वारकऱ्यांवर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांचीही प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या दुर्घटनेत तीन महिला वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून काही वारकरी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले आहेत. प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे तसेच जखमींना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. त्यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली असून मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसेच या घटनेत जखमी झालेल्या वारकऱ्यांवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले आहे. जेजुरीजवळ वारकऱ्यांच्या वाहनाला झालेल्या भीषण अपघातावरून काँग्रेस नेत विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर टीका केली आहे. आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शासन पार पाडण्यात अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या काही वर्षांत वारीतील अपघातांचे प्रमाण वाढत असून, या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या वारकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करत जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थनाही त्यांनी व्यक्त केली.

## गुन्हेगारीविरोधात श्रीरामपूर एकवटले

लोखंडे, नगरसेविका वैशाली चव्हाण, प्रकाश चित्ते यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक सहभागी झाले होते. यावेळी आमदार हेमंत ओगले यांनी शहरात एका विशिष्ट टोळीच्या माध्यमातून संघटित गुन्हेगारी वाढल्याचा आरोप केला. अवैध धंदे, अमली पदार्थांचा व्यापार आणि नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. आकाश दुबैया हत्येचा शेवटपर्यंत पाठपुरावा करू, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. प्रकाश चित्ते यांनी गुन्हेगारांना संरक्षण देणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणी केली. नगरसेविका वैशाली चव्हाण यांनी शहरातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत वाढत्या गुन्हेगारीवर पोलिसांनी प्रभावी नियंत्रण आणावे, असे सांगितले. माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांनी शहरातील अवैध धंदे आणि गुन्हेगारीला मिळणाऱ्या कथित राजकीय पाठबळावर टीका केली. माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनीही अवैध व्यवसायांमुळे तरुण गुन्हेगारीकडे वळत असल्याची खंत व्यक्त करत सर्वपक्षीय पातळीवर एकत्रित कारवाईची गरज अधोरेखित केली. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी गुन्हेगारीविरोधातील आंदोलनाला पाठिंबा दर्शविताना सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आंदोलनाची दिशा बदलण्याचा विचार करण्याची सूचना केली. दरम्यान, आकाश दुबैया हत्याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असली तरी शहरातील संघटित गुन्हेगारीविरोधात व्यापक कारवाई झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. त्यामुळे श्रीरामपूरमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पान १ वरून

## महामंडळ नियुक्त्यांचा मुहूर्त ठरला?

त्यामुळे इच्छुक नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढत होती. आता वाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती समोर आल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीतील संख्याबळ आणि राजकीय वजन लक्षात घेऊन पक्षनिहाय वाटप निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार भाजपला सर्वाधिक ४८ टक्के महामंडळे आणि पदांचा वाटा मिळणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला २९ टक्के, तर राष्ट्रवादी काँग्रेसला २२ टक्के वाटा मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. महायुतीतील इतर छोट्या घटक पक्षांसाठी एकूण १ टक्का वाटा राखून ठेवण्यात आल्याचीही माहिती सूत्रांनी दिली आहे. राज्यात महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर विविध महामंडळांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्त्यांची अपेक्षा होती. मात्र मंत्रिमंडळ विस्तार, स्थानिक स्वराज्य संस्था, संघटनात्मक बदल आणि इतर राजकीय घडामोडींमुळे हा निर्णय सतत पुढे ढकलला गेला. यामुळे सत्ताधारी पक्षांतील अनेक इच्छुक नेते आणि कार्यकर्ते संधीच्या प्रतीक्षेत होते. आता वाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याने लवकरच नियुक्त्यांची प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विधानसभा आणि सरकारमधील संख्याबळाचा विचार करून हे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वाधिक आमदारसंख्या असलेल्या भाजपला मोठा वाटा मिळाला असून, त्यानंतर शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

## सावळीविहीर जंक्शनवरील कोंडी हटणार

संबंधित ठेकेदार, पोलीस प्रशासन तसेच सावळीविहीर, सावळीविहीर बुद्रुक, निमगाव, निगोंज आदी पंचक्रोशीतील ग्रामस्थांची संयुक्त बैठक घेतली. तसेच पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत वाहतूक सुरळीत करण्यासाठी विविध पर्यायी उपायांवर चर्चा करण्यात आली. अवजड वाहनांसाठी स्वतंत्र नियोजन, कामाचा वेग वाढविणे, वाहतुकीचे योग्य नियमन आणि आवश्यक त्या ठिकाणी तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी पुढील तीन दिवसांत करण्यात येणार असून, त्यानंतर वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास डॉ. विखे पाटील यांनी व्यक्त केला. धुळीच्या समस्येबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, रस्त्याच्या भरावावर वारंवार पाणी टाकल्यास तो कोरडा होत नाही आणि त्यावर डांबरीकरण करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत भविष्यात रस्ता खचण्याचा धोका निर्माण होतो. राहुरी परिसरातील काही रस्त्यांवर घाईत काम केल्यामुळे अशा समस्या निर्माण झाल्याचा दाखला देत त्यांनी सांगितले की, दर्जेदार आणि टिकाऊ रस्ता व्हावा यासाठी काही दिवस धुळीचा त्रास सहन करावा लागेल. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले हे काम कायमस्वरूपी दर्जेदार व्हावे, हीच प्रशासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. गुरुपौर्णिमेपूर्वी उड्डाणपुलाच्या शेवटापासून बायपासच्या सुरुवातीपर्यंत रस्त्याची एक बाजू पूर्ण करण्यात येणार असून ती वाहतुकीसाठी खुली केली जाईल. दुसरी बाजू वाहतुकीसाठी मोटरेबल ठेवण्यात येईल. गुरुपौर्णिमेनंतर दुसऱ्या बाजूच्या कामाला गती देण्यात येईल, असा संपूर्ण आराखडा तयार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. रस्त्याच्या मध्यरेषेपासून १५ मीटरच्या हद्दीत येणारी सर्व अतिक्रमणे दोन दिवसांत स्वेच्छेने हटवावीत, असे आवाहन करत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, मुदतीनंतर पोलीस प्रशासनाच्या मदतीने कारवाई करून सर्व अतिक्रमणे हटविण्यात येतील. या अतिक्रमणांमध्ये काही मंदिरे, टपऱ्या आणि इतर बांधकामांचाही समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. दहा वर्षांपासून या रस्त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. आता प्रत्यक्षात काम सुरू झाले आहे. त्यामुळे संयम ठेवून दर्जेदार काम पूर्ण होऊ देणे गरजेचे आहे. चुका झाल्यास त्या दुरुस्त केल्या जातील, पण विकासकामांना अडथळा निर्माण होणार नाही याचीही सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी आणखी एक महत्त्वाची बाब अधोरेखित करत सांगितले की, या कामासाठी सुमारे ४० टक्के कमी दराने ठेका स्वीकारणारा ठेकेदार मिळाला आहे. स्थानिक पातळीवर कोणत्याही प्रकारच्या टक्केवारीची मागणी नसल्याने कामाला गती मिळाली आहे. ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या अडचणी निर्माण होतात, तेथे विकासकामे वर्षानुवर्षे रखडतात, अशी टिप्पणीही त्यांनी केली. दरम्यान, जिल्ह्यात सुरू असलेल्या दूध भेसळविरोधी कारवाईबाबतही डॉ. सुजय विखे पाटील यांनी भूमिका मांडली. भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी, या भूमिकेला त्यांनी स्पष्ट पाठिंबा दिला. मात्र, कोणतीही कारवाई करण्यापूर्वी प्रशासनाने सखोल पडताळणी करणे आवश्यक असून, चुकीच्या पंचनाम्यांमुळे किंवा एकतर्फी कारवाईमुळे प्रामाणिक दूध उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या कारवायांना मिळत असलेल्या प्रसिद्धीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. यापूर्वीही संबंधित अधिकारी अशा कारवाया करत होते. मात्र, आता अचानक या कारवायांना एवढी प्रसिद्धी का मिळत आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित करत, प्रशासनाने निष्पक्ष, पारदर्शक आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## लाडकी बहीणमधून ९२ लाख महिला अपात्र?

केल्याने त्यांना योजनेतून बाद करण्यात आले आहे. ई-केवायसी आणि अंतिम छाननी प्रक्रियेनंतर खालील कारणांमुळे लाभार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. योजनेची ई-केवायसी प्रक्रिया ऑगस्ट २०२५ पासून सुरू करण्यात आली होती. यासाठी ६ महिन्यांचा मोठा कालावधी देण्यात आला होता आणि त्रुटी दुरुस्त करण्यासाठी एप्रिल २०२६ पर्यंत मदत केली गेली. मात्र, वारंवार संधी देऊनही ६० लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली नाही. आयकर विभागाच्या डेटा पडताळणीमध्ये ५ लाख महिलांचे कुटुंब करदाते असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या अपात्र ठरल्या. ज्या महिलांच्या पतीचे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, अशा १४ ते १५ लाख महिलांचा डेटा समोर आल्याने त्यांना वगळण्यात आले. कुटुंबाच्या नावावर चारचाकी वाहन असल्याच्या निकषात न बसल्यामुळे साडेचार ते पाच लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, मात्र तरीही त्यांना लाभ मिळालेला नाही, अशा तक्रारींची सध्या प्रशासनाकडून युद्धपातळीवर पडताळणी सुरू असल्याचेही अदिती तटकरे यांनी सांगितले.

# ८३ ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित

## जिल्हाधिकाऱ्यांची अंतिम मंजुरी; हरकती निकाली



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सदस्य पदाच्या आरक्षणाला जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिम मंजुरी दिली आहे. त्यामुळे पाथर्डी तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असून आता निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची प्रतीक्षा आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने शासन स्तरावर प्रक्रिया सुरू होती. त्यानुसार ८३ ग्रामपंचायतींच्या सदस्य पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. या आरक्षणावर १९ ते २५ जून दरम्यान हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये एकूण पाच ग्रामपंचायतींसंदर्भात सहा हरकती प्राप्त झाल्या. अंबिकानगर ग्रामपंचायतीसंदर्भात दोन, तर राघोहिवरे, मिडसांगवी, टाकळी मानूर आणि सोमठाणे नलवडे या ग्रामपंचायतींसंदर्भात प्रत्येकी एक हरकत दाखल झाली होती.या हरकतींवर ३ जुलै रोजी प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी सुनावणी घेऊन त्या निकाली काढल्या. त्यानंतर शुक्रवारी (ता.१०) जिल्हाधिकाऱ्यांनी आरक्षणाला अंतिम मंजुरी देत ८३ ग्रामपंचायतींचे सदस्य पदाचे अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले.

एकनाथवाडी, चिंचपूर इजदे, भारजवाडी, कौडगाव, जोगेवाडी, पिंपळगव्हाण, करोडी, पिंपळगाव टप्पा, कामत शिंगवे, पागोरी पिंपळगाव, आगसखांड, वाळूज, भिलवडे, रांजणी, अंबिकानगर, टाकळी मानूर, मोहटे, निपाणी जळगाव, खाडगाव, केळवंडी, मांडवे, शेकटे, शिरापूर, भुतेटाकळी, सातवड, कडगाव, धामणगाव, शिराळ, येळी, खेर्डे, कासार पिंपळगाव, घाटशिरस, शिंगवे केशव, कोकीसपीर तांडा, मिडसांगवी, मोहोज खुर्द, हनुमान टाकळी, पारेवाडी, लोहसर, धनगरवाडी, मोहोज बुद्रुक, पत्र्याचा तांडा, तिनखडी, मोहोजदेवढे, आडगाव, माळीबाभुळगाव, देवराई, जवखेडे दुमाला, चुंभळी, कोपरे, आल्हणवाडी, औरंगपूर, मालेवाडी, कळसपिंप्री, चितळी, मुंगूसवाडे, तोंडोळी, सोमठाणे नलवडे, शंकरवाडी, खरवंडी कासार, बोरसेवाडी, ढाकणवाडी, जवळवाडी, सुसरे, नांदूर निंबादैत्य, मढी, मिरी, लांडकवाडी, कारेगाव, चितळवाडी, अकोला, भोसे, शिरसाठवाडी, दुलेचांदगाव, चिंचपूर पांगुळ, सोमठाणे खुर्द, पिरेवाडी, राघोहिवरे, माणिकदौंडी, सांगवी बुद्रुक, जाटदेवळे, घुमटवाडी आणि जांभळी.

### रणधुमाळी रंगण्याची चिन्हे

निवडणुकीपूर्वीची आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता केवळ राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम जाहीर होणे बाकी आहे. कार्यक्रम जाहीर होताच तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतींमध्ये राजकीय हालचालींना वेग येणार असून गावपातळीवरील निवडणुकांची रणधुमाळी रंगण्याची चिन्हे आहेत.

# महिला सरपंच दंडवते यांची कार्यतत्परता

## समयसूचक निर्णयामुळे मोठा अनर्थ टळला



**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकुरी** : साकुरी गावातील उपासणी नगर परिसरात लुटे बंधू यांच्या फरसाण निर्मिती कारखान्याला शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना आज घडली. या दुर्घटनेत लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या संपूर्ण घटनेत साकुरी ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच मेघना संदीप दंडवते यांनी दाखविलेल्या समयसूचकता व कार्यतत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

आग लागल्यानंतर उपासणी नगर परिसरातील एका नागरिकाने सरपंच सौ. मेघना दंडवते यांना दूरध्वनीवरून घटनेची माहिती दिली. त्या त्यावेळी गावाबाहेर असतानाही परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी क्षणाचाही विलंब न करता राहाता नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी तातडीने संपर्क साधला व अग्निशमन दलाची मदत मागवली. सरपंचांच्या तत्पर पाठपुराव्यामुळे काही मिनिटांतच राहाता नगरपालिकेचा अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाने स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यामुळे आग अधिक पसरून शेजारील घरे व इतर मालमत्तेचे मोठे नुकसान होण्याचा धोका टळला. या दुर्घटनेत कारखान्यातील यंत्रसामग्री, कच्चा माल व तयार माल जळून खाक झाला असून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून केवळ वित्तहानी झाली आहे.

संकटकाळात दाखविलेली निर्णयक्षमता, प्रशासनाशी साधलेला तातडीचा समन्वय आणि गावाच्या सुरक्षिततेसाठी केलेली धडपड यामुळे सरपंच मेघना संदीप दंडवते यांच्या कार्याचे ग्रामस्थ, सामाजिक संघटना तसेच विविध स्तरांतील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# ग्रामीण डाक सेवकांनाही मिळणार सभासदत्व

## श्रीरामपूर पोस्टल पतसंस्थेच्या वार्षिक सभेत महत्त्वपूर्ण निर्णय



*''कमीतकमी व्याजदरात, अत्यंत सोप्या व पारदर्शक प्रक्रियेद्वारे सहज कर्ज उपलब्ध करून देणारी संस्था म्हणून राज्यात ओळख निर्माण केलेल्या श्रीरामपूर पोस्टल पतसंस्थेत लवकरच ग्रामीण भागातील ग्रामीण डाक सेवकांनाही सभासदत्वाची संधी उपलब्ध होणार आहे. हा निर्णय त्यांना सहकाराच्या मुख्य प्रवाहात आणणारा आणि संस्थेच्या विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.''*

**राजेंद्र विश्वास, चेअरमन.**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : 'सभासदहित हेच सर्वोपरि, हेच संचालक मंडळाचे ध्येय,' असा विश्वास व्यक्त करत श्रीरामपूर पोस्टल डिव्हिजन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., श्रीरामपूरच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ग्रामीण डाक सेवकांना सभासदत्व देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय एकमताने मंजूर करण्यात आला.

काळे पाटील लॉन्स येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये चेअरमन राजेंद्र विश्वास यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा उत्साहात पार पडली. संस्थेचे कार्यकारी संचालक राधाकिसन पवार यांनी सभेची नोटीस, आर्थिक पत्रके, अंदाजपत्रक व विविध विषय सभेपुढे सादर करून त्यावर सविस्तर विवेचन केले. उपस्थित सभासदांनी सर्व विषयांना टाळ्यांच्या गजरात एकमताने मंजुरी दिली. यावेळी पोस्टल संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष व संस्थेचे जेष्ठ सभासद संतोष यादव यांनी संस्थेच्या सभासदाभिमुख कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले.

संचालक मंडळाने खर्चात मोठ्या प्रमाणावर काटकसर करत सभासदहित जपले असून, कमीतकमी व्याजदरात अधिकाधिक कर्ज सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून दिल्यामुळे सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले. सभेस सभासदाच्या उपस्थितीचे प्रमाण विचारात घेऊन आगामी काळात वार्षिक सभा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करावी तसेच सभेला उपस्थित राहणाऱ्या सभासदांच्या भत्त्यात वाढ करण्याचा सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षाही यादव यांनी व्यक्त केली.

सभेला उपाध्यक्ष मीरा जगधने, कार्यकारी संचालक राधाकिसन पवार, संचालक सागर आढाव, शिवाजी चाफे, रावसाहेब खरात, विजया शहाणे, व्यवस्थापक योगेश बोरूडे यांचे सह सभासद गणेश बनकर उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावरील खड्डे तातडीने बुजवा

## आ.कोल्हे यांची रस्ते विकास महामंडळास निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : नागपूर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील शिर्डी एक्झिट क्रमांक २० परिसरात मोठ्या प्रमाणात पडलेल्या धोकादायक खड्ड्यांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.

तसेच दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत आवश्यक सुरक्षा उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी मा. व्यवस्थापकीय संचालक, समृद्धी महामार्ग प्रकल्प, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आ. कोल्हे यांनी मुंबई-नागपूर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील शिर्डी एक्झिट क्रमांक २० परिसरात पडलेल्या खड्ड्यांच्या बाबत प्रश्न उपस्थित करताना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुंबई-नागपूर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा राज्यातील अत्यंत महत्त्वाचा, द्रुतगती व उच्च दर्जाचा महामार्ग असून तो कोपरगाव मतदारसंघातून जातो.



या महामार्गावरून दररोज हजारो प्रवासी तसेच मालवाहतूक करणारी वाहने अतिवेगाने प्रवास करतात. मात्र, शिर्डी एक्झिट क्रमांक २० परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने रस्त्याची अवस्था गंभीर व धोकादायक बनली आहे.

समृद्धी महामार्गाचा टोल भरूनही वाहनचालकांना अशा स्वरूपाचा मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

त्यामुळे शिर्डी एक्झिट क्रमांक २० परिसरातील सर्व खड्ड्यांची युद्धपातळीवर त्वरित दुरुस्ती करण्यात यावी. तसेच दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत आवश्यक त्या ठिकाणी इशारा फलक, रिफ्लेक्टर, वेगमर्यादा सूचना आणि सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून वाहनचालकांच्या सुरक्षिततेची योग्य ती खबरदारी घेण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# महिलेचा अन्नत्याग उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तोंडोळी (ता. पाथर्डी) येथील मीराबाई राजू पवार यांनी आपल्या तक्रारीतील आरोपीला तात्काळ अटक करून न्यायालयात हजर करण्याची मागणी करत, मागणीची पूर्तता न झाल्यास १४ जुलैपासून पाथर्डी पोलीस ठाण्यासमोर आमरण अन्नत्याग उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे. याबाबत त्यांनी पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, मनोज अंबादास कसाळ याच्याविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल होऊन २० दिवसांचा कालावधी उलटूनही संबंधित आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

आरोपीला अटक करण्यासाठी यापूर्वीही अनेकदा पोलीस ठाण्यात पाठपुरावा करूनही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. आरोपी अद्याप मोकाट असल्याने आपल्या मुलीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, न्याय मिळण्यास विलंब होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. पोलिसांनी १३ जुलैपर्यंत आरोपीला अटक केली नाही तर १४ जुलै रोजी सकाळी पाथर्डी पोलीस ठाण्यासमोर आमरण अन्नत्याग उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

उपोषणादरम्यान आपल्या प्रकृतीला अथवा जीवितास काही बरे-वाईट झाल्यास त्याची जबाबदारी पोलीस प्रशासन व संबंधित फरार आरोपीवर राहील, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी देण्यात आल्या आहेत.

# शाळांना मिळणार व्यायामासाठी साहित्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राज्यात क्रीडा संस्कृतीचा प्रभावी प्रचार-प्रसार करण्यासाठी आणि तरुण पिढीमध्ये नियमित व्यायामाची आवड निर्माण करण्यासाठी राज्य शासनाकडून विशेष पावले उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून शासनातर्फे व्यायामशाळा विकास अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून पात्र संस्थांना आणि आधुनिक साहित्यांच्या खरेदीसाठी तब्बल १४ लाख रुपयांपर्यतचे आर्थिक साहाय्य दिले जाणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील क्रीडा संस्कृतीला मोठी चालना मिळण्यास मदत होत आहे.

ही कागदपत्रे आवश्यक योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करताना संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व अद्ययावत नूतनीकरण पावती, संस्थेच्या जागेची मालकी दर्शवणारा ७/१२ उतारा, मालमत्ता पत्रक किंवा जागेचा मालकी हक्क करारनामा आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.इच्छुक व पात्र संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपला प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे विहित मुदतीत सादर करावा.

या योजनेंतर्गत व्यायामशाळेच्या श्रेणीनुसार आणि गरजेनुसार आर्थिक साहाय्य मंजूर केले जाते. विविध निकषांची पूर्तता करणाऱ्या पात्र संस्थांना १४ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान शासनाकडून मिळू शकते.

# मुख्याधिकाऱ्यांबाबत अपशब्द खपवून घेणार नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : शहराच्या विकासासाठी झटणाऱ्या अधिकाऱ्यांबद्दल सोशल मीडियावर अपशब्द वापरले जात आहेत. हा प्रकार योग्य नसून मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्याबाबतचे अपशब्द कदापि सहन केले जाणार नाहीत, असा स्पष्ट इशारा शिर्डीचे उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी दिला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डीत विविध विकासकामे सुरू आहेत. यात कोट्यवधी रुपये खर्च करून १२ नंबर चारी बंदिस्त करणे, रस्ता रुंदीकरण आणि डांबरीकरणाचे काम सुरू आहे. पानमळा परिसरातील शेतकऱ्यांच्या यासंदर्भात काही अडचणी असून, त्या सोडवण्यासाठी लवकरच डॉ. सुजय विखे यांच्या उपस्थितीत बैठक घेतली जाणार आहे. अभय शेळके यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, सतीश दिघे हे गेल्या दहा वर्षांपासून सर्वांना सोबत घेऊन काम करत आहेत. अशा अनुभवी अधिकाऱ्याचा शहराच्या विकासाला नेहमीच फायदा होतो. काही त्रुटी असल्यास चर्चेतून मार्ग निघू शकतो, मात्र अपशब्द वापरून अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची करणे शहराच्या विकासाला परवडणारे नाही. १२ नंबर चारीच्या प्रश्नावर नगराध्यक्षा जयश्री थोरात आणि सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन एकविचाराने तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय जीवनात माझ्यावर वैयक्तिक टीका झाली तरी मी लक्ष देत नाही, मात्र अधिकाऱ्यांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही. विखे परिवाराने दिलेल्या संधीचे आपण सोने करू, असे शेळके यांनी स्पष्ट केले.

# अकोले शहरातील अतिक्रमणे हटवा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोले शहरातील कोल्हार-घोटी रोड व इतर प्रमुख मार्गांवरील पादचारी सुविधा आणि फुटपाथवरील अतिक्रमणे तात्काळ हटवून पादचाऱ्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करावे, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या वतीने करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या १९ जून २०२६ च्या आदेशाचे पालन करण्याबाबतचे निवेदन अकोले नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी धनश्री पवार यांना देण्यात आले. अकोले शहराचे वाढते नागरीकरण, बाजारपेठ, अगस्ती सहकारी कारखाना आणि शैक्षणिक संस्थांमुळे शहरात नागरिकांसह वाहनांची मोठी गर्दी होत आहे.

मुख्य रस्त्यांसह पादचारी मार्ग आणि फुटपाथवर दुचाकी, चारचाकी वाहने तसेच खाद्यपदार्थ विक्रेते आणि हातगाड्यांची मोठी अतिक्रमणे झाली आहेत. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विद्याथ्यर्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्यावरून चालणारा नागरिक हा वाहतूक व्यवस्थेतील प्रथम प्रवासी आहे.

त्याला सुरक्षित आणि अडथळामुक्त चालण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेनुसार मिळालेला आहे.

# मतदार यादी पुनरीक्षणात हलगर्जी; बीएलओवर गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत निष्काळजीपणा केल्याप्रकरणी शाहपूर (भाग क्र. २३१) येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तथा कृषी सहाय्यक अमोल अशोक साळवे यांच्याविरुद्ध नेवासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संजय बिरादार यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २२१-नेवासा विधानसभा मतदारसंघात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण सुरू आहे. या मोहिमेत गणना प्रपत्रांचे वाटप, संकलन आणि संगणकीकरणाची जबाबदारी अमोल साळवे यांच्याकडे होती. मात्र, त्यांनी कामात कोणतीही अपेक्षित प्रगती न दाखविता कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कामाचा आढावा घेण्यासाठी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक आणि तहसील कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वारंवार दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी फोन स्वीकारला नाही किंवा कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. तहसीलदार बिरादार यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता तसेच संबंधित निवडणूक कायद्यातील तरतुदींनुसार नेवासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पुढील विभागीय आणि कायदेशीर कारवाईसाठी प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

# बोगस डॉक्टरांवर कायमचा इलाज - क्यूआर कोडवरून कुंडली दिसणार

## क्लिनिकल विधेयक विधानसभेत सादर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नागरिकांना नोंदणीकृत आणि अधिकृत डॉक्टरांची अचूक माहिती सहज उपलब्ध व्हावी, तसेच बोगस डॉक्टरांकडून होणाऱ्या फसवणुकीला आळा बसावा, यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत नो युवर डॉक्टर ही क्यूआर कोड आधारित प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

या प्रणालीमुळे प्रत्येक डॉक्टरची नोंदणी, शैक्षणिक पात्रता, वैद्यकीय परवाना आणि वैधता याची संपूर्ण माहिती एका क्यूआर कोड स्कॅनद्वारे नागरिकांना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे रुग्णांना उपचार घेताना अधिक सुरक्षितता मिळणार असून, आरोग्य सेवेत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी कायद्याऐवजी महाराष्ट्र इस्टॅब्लिशमेंट्स क्लिनिकल विधेयक विधानसभेत सादर केले आहे. या कायद्यानुसार सर्व प्रकारच्या क्लिनिकची नोंदणी व दरफलक लावणे बंधनकारक करण्यात येणार आहे.आरोग्य विभागाने मागील पाच वर्षात जिल्ह्यात ७१ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली होती. यातील ४१ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सध्या यातील अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.



नागरिकांनी बोगस डॉक्टरांविषयी संशय असल्यास त्वरित महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तक्रार मिळाल्यानंतर संबंधित यंत्रणा तत्काळ चौकशी करून आवश्यक ती कारवाई करते. राज्यात १९४९ च्या महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी कायद्यानुसार हॉस्पिटलची नोंदणी केले जाते.

*सर्व प्रकारच्या क्लिनिकची नोंदणी झाले पाहिजे, परंतु शासनाने जाचक अटी लादू नयेत. सिंगल बेडच्या क्लिनिकला प्रदूषण मंडळ, अग्निशमन किंवा जैव-वैद्यकीय कचरा आदी अटीतून वगळावे. ५ बेडच्या क्लिनिकपासून या अटी लागू कराव्यात.*

**डॉ. रणजित सत्रे,**
**जिल्हा होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशन, अहिल्यानगर.**

या कायद्यात क्लिनिकच्या नोंदणीची तरतूद नाही. त्यामुळे जिल्ह्यात नेमकी किती क्लिनिक कार्यरत आहेत, याची अधिकृत माहिती आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाही.

# शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध

## मंत्री जयकुमार रावल; जयहिंद लोकचळवळीकडून राज्यभरातील कर्तृत्ववान शेतकऱ्यांचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी करीत आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा, सिंचन प्रकल्प, कृषी पायाभूत सुविधा, कोल्ड चेन, डिजिटल कृषी व्यवस्था आणि महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी शासन सातत्याने काम करत असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

जयहिंद लोकचळवळीच्या कृषी विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय युवा शेतकरी सन्मान सोहळा २०२६ उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते.




नाशिक येथे झालेल्या या सोहळ्यात राज्यभरातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हरितक्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे यंदा दहावे वर्ष होते.

लोकनेते बाळासाहेब थोरात आणि जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आ. सत्यजीत तांबे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येतो. कार्यक्रमाला राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, दिंडोरीचे खा. भास्कर भगरे, सह्याद्री फार्म्सचे संस्थापक विलास शिंदे, आ. मनोज कायंदे, दुर्गाताई तांबे, प्रवीण जाधव, नामदेवराव गुंजाळ, प्रा. सुनील बच्छाव यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.सुधीर तांबे यांनी जयहिंद लोकचळवळीच्या २८ वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, शेती, शिक्षण, आरोग्य, युवक आणि महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून सुदृढ समाज उभारण्याचा चळवळीचा संकल्प असल्याचे सांगितले.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण आणि अण्णासाहेब शिंदे यांच्या योगदानाचे स्मरण करत, देशाच्या प्रगतीचा पाया हा शेतीत असल्याचे अधोरेखित केले. हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता आणि विक्री व्यवस्थेतील अडचणी ही शेतीसमोरील प्रमुख आव्हाने असल्याचे त्यांनी सांगितले.

> शेतकऱ्यांनी केलेले यशस्वी प्रयोग कृषी विद्यापीठांनी अभ्यासून राज्यभर पोहोचविणे आवश्यक आहे. सह्याद्री फार्म्ससारखी शेतकरी उत्पादक कंपन्यांची यशस्वी मॉडेल्स ग्रामीण भागात उभी राहिली तर शेतीला नवी दिशा मिळेल. समूहशेती, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि सक्षम पणन व्यवस्था यांशिवाय शेतीचा विकास शक्य नाही. शेतकऱ्यांचा सन्मान हा केवळ पुरस्कारापुरता न राहता त्यांच्या कार्यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली पाहिजे, अशी अपेक्षा आहे.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

खा. भास्कर भगरे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शेतीत वेगळे प्रयोग करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. सह्याद्री फार्म्सचे मॉडेल राज्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, उत्पादनाबरोबर प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग आणि बाजारपेठेचे नियोजनही तितकेच महत्त्वाचे आहे.

आ. कायंदे म्हणाले की, जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून कृषी, शिक्षण, सामाजिक आणि युवक क्षेत्रात सुरू असलेल्या उपक्रमांचा उल्लेख केला. राज्यभरातील यशस्वी शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्या प्रयोगांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्या माध्यमातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणे.

# पाथर्डीत भरदिवसा धूमस्टाईल दरोडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी शहरातील आनंदनगर परिसरात भरदिवसा दुचाकीवरून आलेल्या तिघा अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. ११) सायंकाळी घडली. अचानक झालेल्या या प्रकारात महिलेचा तोल जाऊन त्या रस्त्यावर कोसळल्या. दिवसाढवळ्या घडलेल्या या धाडसी चोरीमुळे शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आनंदनगर येथील संगीता सुधाकर पाखरे (वय ५३) या आपल्या मैत्रीण अर्चना खेडकर यांच्यासमवेत पायी आनंदनगरकडे जात होत्या. सायंकाळी सुमारे ६.१५ वाजण्याच्या सुमारास शेवगाव रस्त्यावरील अर्जुन बाबा मंदिराजवळ स्पोर्ट्स दुचाकीवरून आलेल्या तिघा अज्ञात चोरट्यांनी त्यांचा पाठलाग केला. योग्य संधी साधत मागे बसलेल्या एका आरोपीने संगीता पाखरे यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण जोराने हिसकावून घेतले.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे संगीता पाखरे यांचा तोल जाऊन त्या रस्त्यावर पडल्या. त्यांच्या मैत्रीण अर्चना खेडकर यांनी आरडाओरडा केला; मात्र आरोपी क्षणार्धात भरधाव वेगाने पसार झाले. या घटनेत सुमारे एक लाख रुपये किमतीचे मिनी गंठण चोरट्यांनी लंपास केले.

### अस्थी विसर्जनातून

# वृक्षारोपणाचा अनोखा संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील नाऊर येथील आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत आणि पंचक्रोशीत विणेकरी म्हणून परिचित असलेले चांगदेव बबन गुंड (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे चिरंजीव तथा पर्यावरणप्रेमी उद्योजक कृष्णा गुंड यांनी पारंपरिक अस्थी विसर्जनाला पर्यावरणपूरक स्वरूप देत एक प्रेरणादायी उपक्रम राबविला.

अस्थी विधीनंतर काही अस्थी नदीत विसर्जित न करता आपल्या



शेताच्या बांधावर विसर्जित करण्यात आल्या. त्याच ठिकाणी वड, नारळ, बेल, चिक्कू, आंबा आदी विविध वृक्षांची लागवड करून वडिलांना अनोखी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. भविष्यात हे वृक्ष मोठे झाल्यानंतर त्यांच्या छायेत बसताना वडिलांच्या स्मृती कायम जिवंत राहतील, तसेच पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागेल, अशी भावना कृष्णा गुंड यांनी व्यक्त केली.

उद्योजक कृष्णा गुंड हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक दायित्व जपत पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत आहेत.

# हरित प्रभागासाठी संपत बारस्करांचा पुढाकार

## पवननगर येथे वृक्षारोपण करून एक कुटुंब-एक झाड अभियानाचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : एक कुटुंब-एक झाड उपक्रमांतर्गत नागरिकांना आंब्याची रोपे मोफत देण्यात येत असून या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या माध्यमातून हरित प्रभागाची संकल्पना यशस्वीपणे राबविली जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संपत बारस्कर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संपत बारस्कर यांच्या



पुढाकारातून पवननगर येथे वृक्षारोपण करून एक कुटुंब-एक झाड अभियानाचा शुभारंभ महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी नागरिकांमध्ये दहा ते बारा फूट उंचीच्या आंब्याच्या रोपांचे वितरण करून पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, नगरसेवक संपत बारस्कर हे जनतेच्या प्रश्नांसाठी चोवीस तास उपलब्ध असतात. प्रभागाच्या विकासकामांसाठी सातत्याने

> महापालिकेच्या डीपी रस्ते व खुल्या जागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन केले जात आहे. आमदार संग्राम जगताप व आयुक्त यशवंत डांगे यांच्या सहकार्यामुळे प्रभाग क्रमांक एकमधील नागरिकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी मोठा निधी उपलब्ध झाला असून विकासकामांमुळे प्रभागाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. निधीच्या माध्यमातून कुठेही चुकीची कामे न होता विकासकामांतून प्रभागाचा चेहरामोहरा बदलला आहे.
>
> **– संपत बारस्कर, नगरसेवक**

पाठपुरावा करून गेल्या चार वर्षांत सुमारे दीडशे कोटी रुपयांची विकासकामे मार्गी लागली असून दर्जेदार कामे नागरिकांना पाहावयास मिळत आहेत.

कार्यक्रमास नगरसेवक संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, सामाजिक कार्यकर्ते पैलवान शिवाजी चव्हाण, रंजना उकिरडे, शिल्पा दुसुंगे यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नागरिकांनो, माहिती सादर करा : पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : आगामी कर्जत नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना देण्यात आली असून, भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेंतर्गत कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात मतदार पडताळणीचे काम वेगाने सुरू आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क न झाल्यास अथवा आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याचा इशारा प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिला आहे.

प्रांताधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात विशेष सखोल मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तहसीलदार रवी सत्वन, निवडणूक नायब तहसीलदार योगेश्वर जाधव, महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच बीएलओ उपस्थित होते.

प्रांताधिकारी नितीन पाटील म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनर्निरीक्षण




> सन २००२ नंतर तब्बल २४ वर्षांनी मतदार यादीचे सखोल पुनर्निरीक्षण होत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करणे हा आहे. एका व्यक्तीचे दोन किंवा अधिक मतदारसंघांमध्ये असलेले नाव शोधून ते वगळणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नोंद अद्ययावत करणे तसेच पात्र नागरिकांचा समावेश सुनिश्चित करणे, या मोहिमेद्वारे केले जाणार आहे.
>
> **– नितीन पाटील, प्रांताधिकारी**

मोहीम राबविण्यात येत आहे. मतदारसंघातील एकूण ३ लाख ५० हजार ५२४ मतदारांपैकी ३ लाख २४ हजार ९२३ मतदारांना अर्जांचे वाटप करण्यात आले आहे.

# कठोर परिश्रमातूनच घडतात ‘आयपीएस’

## तहसीलदार उद्धव नाईक; निऱ्हाळी विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : गुणवंत होण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांना पर्याय नसतो. कुठल्याही यशाचा शॉर्टकट नसून ध्येय निश्चित करून चिकाटीने प्रयत्न करणारेच आयुष्यात मोठे यश मिळवतात, असे प्रतिपादन पाथर्डीचे तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी केले.

पाथर्डी शहरातील एम. एम. निऱ्हाळी विद्यालयात आयोजित दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर, एकलव्य शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दीपक देशमुख, प्राचार्य संजय घिगे, एकनाथ ढोले, शरद मेढे, राजेंद्र डागा, गिरीश जोर्वेकर, गणेश खेडकर, विठ्ठल वारकड, अपर्णा शेळगावकर, छाया निऱ्हाळी, रामनाथ चौधरी यांच्यासह आदी उपस्थित होते.

डॉ. नाईक म्हणाले की, पाथर्डी तालुक्याने आयएएस अविनाश ढाकणे आणि आयपीएस महेश भागवत यांच्यासारखे कर्तृत्ववान अधिकारी राज्याला दिले आहेत. त्यामुळे ऊसतोड

> मुलींची छेडछाड, त्रास किंवा अन्य कोणताही गैरप्रकार घडल्यास भीती न बाळगता तात्काळ पाथर्डी पोलिसांशी संपर्क साधावा. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी एका महिला पोलीस उपनिरीक्षकांचा विद्यार्थ्यांच्या सोशल मीडिया समूहात समावेश करण्यात आला असून प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन कठोर कारवाई केली जाईल.
>
> **– आनंद कोकरे, पोलीस निरीक्षक**

कामगारांचा तालुका अशी असलेली ओळख आता अधिकाऱ्यांचा तालुका म्हणूनही निर्माण होत आहे. ही गौरवशाली परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या विद्यार्थ्यांवर असून त्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने मेहनत घेतली पाहिजे.

कार्यक्रमात दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय घिगे यांनी केले. सूत्रसंचालन राधाकृष्ण कोठे व सुरेखा वाघमोडे यांनी केले, तर आभार माणिक पालवे यांनी मानले.

# संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे स्वागत

## महापौर गाडे व आयुक्त डांगे यांच्याकडून अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात धार्मिक व भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या निनादाने आणि विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण शहर दुमदुमून गेले.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने दिंडी मार्गावर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच ठिकठिकाणी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व निवासाची व्यवस्था करण्यात आली. आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांची आरोग्य तपासणीही करण्यात आली.

महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज महामार्गावर महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांनी पालखीचे स्वागत केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर अमोल गाडे नगरसेवक ऋग्वेद गंधे व उपायुक्त मेहर लहारे उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, वारकऱ्यांना सर्व आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेने विशेष नियोजन केले आहे. सेवा व सुविधांच्या माध्यमातून वारकऱ्यांचा प्रवास सुखकर व सुरक्षित व्हावा, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.



> महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून आषाढी एकादशीच्या निमित्ताने हजारो वारकरी पायी दिंडी सोहळ्याद्वारे विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या परंपरेतून आपल्या समृद्ध अध्यात्मिक वारशाचे जतन व संवर्धन होत आहे.
>
> **– ज्योतीताई गाडे, महापौर**

# ‘रेल्वे मार्गासाठी संगमनेरकरांचा निर्धार’

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा सरळ मार्ग कायम ठेवण्यात यावा, ही संगमनेरकरांची रास्त आणि महत्त्वाची मागणी असून त्यासाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत तज्ज्ञांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाकडे स्वतः प्रभावी पाठपुरावा करण्याची ग्वाही दिल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा सरळ मार्ग रद्द करण्यात आल्याच्या निषेधार्थ तसेच हा निर्णय तातडीने मागे घेण्याच्या मागणीसाठी देवगाव ग्रामस्थांच्या वतीने संगमनेर बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या आंदोलनस्थळी आमदार अमोल खताळ यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्यांना जाहीर पाठिंबा दर्शविला आणि त्यांच्या मागण्यांशी शासन स्तरावर न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

आ. खताळ म्हणाले की, पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा सरळ मार्ग हा संगमनेरच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून भविष्यातील औद्योगिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी हा प्रकल्प निर्णायक ठरणार आहे. सरळ मार्गाचा प्रस्ताव रद्द झाल्याने तालुक्यातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून हा निर्णय बदलण्यासाठी शासनाच्या सर्व स्तरांवर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

# खर्डा ग्रामपंचायत विभाजनाला हिरवा कंदील

## विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे मुख्य सचिवांना तातडीचे निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीच्या विभाजनाच्या प्रश्नाला अखेर मोठी गती मिळाली आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांना दूरध्वनीवरून खर्डा ग्रामपंचायतीचे विभाजन तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे खर्डा परिसरातील सहा गावांच्या विकासाचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे निर्माण झाली



असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत नागोबाची वाडी, मुंगेवाडी, दरडवाडी, पांढरेवाडी, गीतेवाडी आणि गवळवाडी या गावांचा समावेश आहे. ग्रामपंचायतीची लोकसंख्या मोठी असल्याने मुख्य गावाबाहेरील वाड्या-वस्त्यांचा अपेक्षित विकास होत नसल्याची तक्रार अनेक वर्षांपासून होती. विविध शासकीय योजना, निधी आणि विकासकामांपासून ही गावे वंचित राहत असल्याने ग्रामस्थांकडून स्वतंत्र ग्रामपंचायतीची सातत्याने मागणी केली जात होती.

या प्रश्नाची गंभीरता लक्षात घेऊन यासंदर्भात संभाजीनगर उच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, १२ जुलै रोजी नागोबाची वाडी, गवळवाडी, गीतेवाडी, पांढरेवाडी, मुंगेवाडी आणि दरडवाडी येथील ग्रामस्थांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांची भेट घेऊन ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

ग्रामस्थांच्या भावना आणि दीर्घकालीन मागणीची दखल घेत प्रा. राम शिंदे यांनी तत्काळ ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांशी दूरध्वनीवर संपर्क साधत विभाजनाची प्रक्रिया विलंब न करता पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

प्रस्तावित आराखड्यानुसार खर्डा गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत राहणार असून, दरडवाडी, पांढरेवाडी, गीतेवाडी आणि गवळवाडी मिळून दुसरी स्वतंत्र ग्रामपंचायत तर नागोबाची वाडी आणि मुंगेवाडी मिळून तिसरी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात येणार आहे.

### मूलभूत सुविधांच्या मिळणार वेग

विभाजनामुळे तिन्ही ग्रामपंचायतींना शासनाकडून स्वतंत्र निधी उपलब्ध होणार असून रस्ते, पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांच्या विकासाला वेग मिळणार आहे. अनेक वर्षांपासून रखडलेला प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने पाऊल पडल्याने परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्तक्षेपाबद्दल नागरिकांनी जाहीर आभार मानत फटाके फोडून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

# ... अखेर लिंपणगावच्या तलावात ‘घोड’चे पाणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येचे लिंपणगाव येथील ग्रामस्थांना अखेर मोठा दिलासा मिळाला असून गावच्या जुन्या तलावात घोड कालव्याचे पाणी सोडण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर मार्गी लागल्याने गावात समाधानाचे वातावरण आहे.

काही वर्षांपूर्वी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डीच्या कामादरम्यान संबंधित ठेकेदाराने लिंपणगावच्या गायरान जमिनीतून मुरूम उत्खनन केले होते. त्याच्या मोबदल्यात गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या मागणीनुसार घोड कालव्यापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावरून पाच इंची पाईपलाईन गावच्या मुख्य तलावापर्यंत टाकण्यात आली होती. मात्र पाणी उपशासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा न जोडल्यामुळे ही योजना अनेक वर्षे बंदच राहिली.

माजी सरपंच अरविंद कुरुमकर यांनी ग्रामपंचायत प्रशासनाने या महत्त्वाच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप केला होता. काही ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणाचा इशाराही दिला होता. त्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाल करत पाणी उपशासाठी आवश्यक विद्युत जोडणी पूर्ण केली.

# कारेगाव सोसायटीवर जनसेवा मंडळाचे निर्विवाद वर्चस्व

## दीपकराव पटारे यांच्या नेतृत्वावर चौथ्यांदा शिक्कामोर्तब

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या जनसेवा मंडळाने एकहाती विजय मिळविला. १३ पैकी सर्व १३ जागा जिंकत संस्थेवरील वर्चस्व सलग चौथ्यांदा कायम राखण्यात मंडळाला यश आले. माजी सभापती दीपकराव पटारे यांच्या नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला. या निवडणुकीत माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या



लोकसेवा मंडळाला पराभवाचा सामना करावा लागला.

रविवारी (१२ जुलै) झालेल्या निवडणुकीत ७०४ पैकी ६६४ सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला. तब्बल ९५ टक्के मतदान झाल्याने निवडणुकीबाबत मोठी उत्सुकता होती. सायंकाळी मतमोजणीनंतर जनसेवा मंडळाच्या सर्व उमेदवारांचा विजय स्पष्ट झाला.

माजी सभापती दीपकराव पटारे यांनी सर्वाधिक ४५० मते मिळवून विजय संपादन केला. विद्यमान चेअरमन सतीश पटारे, नानासाहेब गोरे, बाळासाहेब पटारे, कैलास नरसाळे, जालिंदर होले, राहुल भवार, मच्छिंद्र उंडे, मंगल लवांडे, मंगलबाई उंडे, शिवाजी ठोकळ, नवनाथ भवार आणि सचिन दांडगे हे उमेदवारही विजयी झाले.

या निवडणुकीत लोकसेवा मंडळाला ससाणे गटाचा पाठिंबा होता. तर जनसेवा मंडळाच्या प्रचाराची धुरा शेतकरी संघटनेचे नेते बाळासाहेब पटारे यांनी सांभाळली. प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांनी गावोगावी संपर्क साधत सभासदांपर्यंत पोहोचल्याचा फायदा जनसेवा मंडळाला झाल्याचे निकालातून स्पष्ट झाले.

विजयानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी बोलताना दीपकराव पटारे म्हणाले, ''सभासदांनी सलग चौथ्यांदा आमच्यावर विश्वास दाखविला आहे. हा विजय कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचा आणि सभासदांच्या विश्वासाचा आहे. संस्थेच्या विकासासाठी आणि सभासदांच्या हितासाठी पूर्वीप्रमाणेच काम सुरू राहील.''

शेतकरी संघटनेचे नेते बाळासाहेब पटारे, निवृत्त पणन अधिकारी दादासाहेब पटारे, भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष महेंद्र पटारे यांनी नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन करून सभासदांचे आभार मानले.

सहाय्यक निबंधक गडेकर यांच्या देखरेखीखाली निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. दुपारी चारपर्यंत मतदान झाल्यानंतर तत्काळ मतमोजणी करण्यात आली आणि सायंकाळी निकाल जाहीर करण्यात आला. कारेगाव सोसायटीतील या निकालामुळे श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील सहकार आणि स्थानिक राजकारणात जनसेवा मंडळाचे वर्चस्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# करंजी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी अकोलकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी संतोष अकोलकर तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब मोरे यांची नुकतीच निवड करण्यात आली. रविवारी सेवा संस्थेच्या सभागृहात झालेल्या बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या.

करंजी विविध कार्यकारी सेवा संस्था ही तालुक्यातील अग्रगण्य सेवा संस्था म्हणून ओळखली जाते. संस्थेची स्वतःची प्रशस्त इमारत, भक्कम आर्थिक स्थिती आणि कायमस्वरूपी अ वर्ग दर्जा ही तिची वैशिष्ट्ये असून परिसरातील प्रतिष्ठित संस्थांपैकी एक म्हणून तिची ओळख आहे.

मार्गदर्शक बाळासाहेब अकोलकर व विजयराव अकोलकर यांच्या नेतृत्वाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. सहाय्यक निबंधक जी. एम. नांगरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष अकोलकर हे चितळी व तिसगाव सेवा संस्थेचे सचिव असून सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव करंजी सेवा संस्थेच्या विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास बाळासाहेब अकोलकर यांनी व्यक्त केला. याप्रसंगी वसंत क्षेत्रे, झुंबरराव क्षीरसागर, बाळासाहेब अकोलकर, आसाराम अकोलकर, नंदू अकोलकर, संभाजी अकोलकर, सुमन अकोलकर, हरिभाऊ अकोलकर, महादेव नजन, रमेश अकोलकर आदी उपस्थित होते.

# कणगरमध्ये उपजिल्हाधिकाऱ्यांची अचानक भेट

## सरपंच यांचा मतदार पुनरीक्षणाचा फॉर्म भरून घेतला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी रविवारी सुटीच्या दिवशी राहुरी तालुक्यातील कणगर गावाला अचानक भेट देत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. यावेळी गावचे सरपंच सर्जेराव घाडगे यांनी अद्याप गणना पत्रक (ईएफ फॉर्म) भरले नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर गाढे यांनी स्वतःच्या उपस्थितीत त्यांचा फॉर्म भरून घेतला.

ग्रामस्थांशी संवाद साधताना गाढे यांनी विशेष पुनरीक्षण मोहिमेचे महत्त्व स्पष्ट केले. गणना पत्रक न भरल्यास मतदार



यादीत नाव समाविष्ट होण्यास अडचण निर्माण होऊ शकते, याची त्यांनी जाणीव करून दिली. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देतील, त्यावेळी नागरिकांनी आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कुटुंबातील सदस्य बाहेरगावी असले तरी त्यांच्या वतीने कुटुंब प्रमुखाने फॉर्म भरून द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम सुरू आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ९० टक्क्यांहून अधिक गणना पत्रकांचे वितरण पूर्ण झाले असून सुमारे २० टक्के फॉर्मचे डिजिटायझेशनही करण्यात आले आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे अनेक केंद्रांवर शंभर टक्के काम पूर्ण झाले असून उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात येणार असल्याची माहिती गाढे यांनी दिली.

या भेटीदरम्यान कणगर ग्रामस्थांच्या वतीने सुनील गाढे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट काम करणारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी भारत खाटेकर आणि प्राथमिक शिक्षक उबाळे यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी सरपंच सर्जेराव घाडगे, उपसरपंच बाळासाहेब गाढे, गोविंद दिवे, भाऊसाहेब नालकर, भास्कर वारघुडे, बाबुराव घाडगे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# कोपरगावातील वाढत्या गुन्हेगारीवर कठोर कारवाईचे आदेश

## सलग चोरीच्या घटनांची आ. कोल्हे यांच्याकडून दखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : शहरात गेल्या दोन दिवसांत



घडलेल्या सलग चोरी, घरफोडी आणि चैन स्नॅचिंगच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांची आमदार विवेक कोल्हे यांनी गंभीर दखल घेत पोलिस प्रशासनाला तातडीने कठोर आणि परिणामकारक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कोपरगावसारख्या शांत शहरात अशा घटना सातत्याने घडणे ही चिंतेची बाब असल्याचे नमूद करत आमदार कोल्हे




**गस्त वाढविण्याच्या पोलिसांना सूचना**

यांनी संबंधित आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करण्याचे निर्देश दिले. शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

संवेदनशील भागांमध्ये दिवस-रात्र पोलिस गस्त वाढविणे, रात्री विशेष पेट्रोलिंग करणे, संशयित व्यक्तींवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि सीसीटीव्ही यंत्रणेचा प्रभावी वापर करून गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांना सांगितले.

महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत कोणतीही हयगय न करता कठोर कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नागरिकांनीही सतर्क राहून संशयास्पद हालचालींची तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आमदार विवेक कोल्हे यांनी केले.

# कर्जतमध्ये उपनगराध्यक्षपदावरून भाजपमध्ये हालचाली वेग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : नगराध्यक्षपदाचा पेच सुटल्यानंतर कर्जत नगरपंचायतीत आता उपनगराध्यक्षपदाच्या निवडीवरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. १५ जुलै रोजी होणाऱ्या विशेष सभेपूर्वी भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका ताराबाई सुरेश कुलथे आणि नगरसेविका मोनाली ओंकार तोटे यांनी उपनगराध्यक्षपदासाठी दावा केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यामुळे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासमोर पक्षातील विविध इच्छुकांमध्ये समन्वय साधण्याचे आव्हान उभे राहिल्याचे बोलले जात आहे.

या पार्श्वभूमीवर सोमवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात प्रा. राम शिंदे यांनी आपल्या गटातील नगरसेवकांची बैठक घेतली. बैठकीला बहुतांश नगरसेवक उपस्थित होते. मात्र, ताराबाई कुलथे आणि मोनाली तोटे या दोघी अनुपस्थित राहिल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले.

राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, उपनगराध्यक्षपदासाठी आमच्यापैकी एकीला संधी द्यावी, अशी भूमिका कुलथे आणि तोटे यांनी पक्ष नेतृत्वासमोर मांडली आहे. उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे यांच्यावरील अविश्वास प्रस्तावावरील निर्णयापूर्वीच पक्षाने भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आल्याचे समजते.

कुलथे कुटुंबाचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या उभारणीत मोठा सहभाग राहिला आहे. कै. पोपटभाऊ कुलथे आणि कै. सुरेश कुलथे यांनी तालुक्यात संघटन विस्तारासाठी केलेल्या कार्याची पक्षात आजही दखल घेतली जाते. त्याच परंपरेत सचिन कुलथे यांनी सामाजिक, धार्मिक आणि संघटनात्मक क्षेत्रात सक्रिय काम करत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

राजकीय घडामोडींमध्ये पक्षाच्या निर्णयास सातत्याने साथ दिल्यामुळे कुलथे कुटुंबाला यावेळी संधी मिळणार का, याची चर्चा भाजप कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. काही नगरसेवकांचा पाठिंबा कुलथे-तोटे यांना असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

दरम्यान, १५ जुलै रोजी उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे यांच्यावरील अविश्वास प्रस्तावावर निर्णय होणार असून त्यानंतर नव्या उपनगराध्यक्षाची निवड होणार आहे. त्यामुळे अंतिम निर्णयाकडे कर्जतच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या निवडीतून पक्ष नेतृत्व कोणता संदेश देते, याची उत्सुकताही कार्यकर्त्यांमध्ये आहे.

# 'राष्ट्रहितासाठी बुद्धिजीवी वर्गाने पुढे यावे': ॲड. प्रताप ढाकणे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : देशाची आणि समाजव्यवस्थेची सध्याची परिस्थिती चिंताजनक असून राष्ट्रहित, सामाजिक बांधिलकी आणि लोकजागृतीच्या भावनेतून बुद्धिजीवी वर्गाने संघटितपणे पुढे येण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते ॲड. प्रताप ढाकणे यांनी केले.

तालुक्यातील टाकळीमानूर येथील भूमिपुत्र ॲड. गणेश शिरसाट यांची महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलच्या सदस्यपदी विक्रमी मताधिक्याने निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी गहिनीनाथ शिरसाट, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष शुभम गाडे, बाबासाहेब ढाकणे, बप्पासाहेब शिरसाट, वच्छाला शिरसाट, सरपंच डॉ. विजय किसवे, नानासाहेब गाडे, सुनील मुनोत, नितीन शिंदे, शिवाजी कंठाळे, डॉ. नागेश शिरसाट, अजित शिरसाट, आशिष शिरसाट यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. ढाकणे म्हणाले, पाथर्डी तालुक्याने संतपरंपरेबरोबरच प्रशासन आणि न्याय क्षेत्रातही अनेक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे घडविली आहेत. ॲड. गणेश शिरसाट यांच्या निवडीमुळे तालुक्याच्या लौकिकात भर पडली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी आहे.

सत्काराला उत्तर देताना ॲड. गणेश शिरसाट यांनी आपल्या यशाचे श्रेय गावच्या संस्कारांना आणि ग्रामस्थांच्या प्रेमाला दिले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत कायद्याच्या स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनातून हजारो न्यायाधीश, शेकडो सरकारी वकील आणि अनेक विधिज्ञ घडविण्याचे कार्य करता आले, हीच मोठी समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून उच्च शिक्षणासाठी पुढे यावे, असे



आवाहनही त्यांनी केले.

महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलच्या निवडणुकीत सुमारे दोन लाख मतदारांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्र, गोवा, दमण आणि दीव या कार्यक्षेत्रासाठी १८ पुरुष व सात महिला सदस्यांची निवड झाली असून, त्यामध्ये ॲड. शिरसाट यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळविला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र नागरे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. अजित ठोंबरे यांनी, तर आभार शहादेव शिरसाट यांनी मानले.

# 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात मांडव्य ऋषी पायी दिंडी पंढरीकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकुर** : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथे रविवारी भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा संगम अनुभवायला मिळाला. श्रीक्षेत्र मांडव्य ऋषी मंदिरातून निघालेल्या मांडव्य ऋषी पायी दिंडी सोहळ्याचे शेकडो वारकऱ्यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे उत्साहपूर्ण वातावरणात प्रस्थान झाले.

संत माणिकगिरी महाराज व धनाजी बाबा जाधव यांच्या कृपाशीर्वादाने तसेच नाथा बाबा गागरे आणि सावळाहरी गागरे यांच्या प्रेरणेने आयोजित या दिंडी सोहळ्याचे यंदाचे १९ वे वर्ष आहे. प्रस्थानापूर्वी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आरती करून वीणा, तुळशी वृंदावन आणि कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले.

भगव्या पताका खांद्यावर घेत वारकरी टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंग आणि हरिनामाच्या अखंड घोषात पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले. 'ज्ञानोबा माऊली-तुकाराम'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. हरिनाम सप्ताह, भजन आणि अभंग गायनातून विठ्ठलभक्तीचा जागर करण्यात आला. या दिंडीमुळे वारकरी परंपरा, सामाजिक ऐक्य आणि अध्यात्मिक संस्कारांचे जतन होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. प्रभू महाराज पिटाळे (पालघर), नंदकुमार महाराज सोनवणे, भीमराज महाराज उगलमुगले आणि रावसाहेब पाटील गागरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा होत आहे.

**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name

**JAVED ISMAIL SHAIKH**

**(BEFORE NAME)**

To New Name As

**JAVED ISMAIL QURESHI**

**(AADHAR NO. 3886-3050-1194)**

FORM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC

PLACE : SHRIRAMPUR
DATE : 13/07/2026

# शेवगावात मतदार पुनरीक्षण मोहिमेला स्वयंसेवी हातभार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेला शेवगावमध्ये स्वयंसेवी संस्थांचा सक्रिय हातभार लाभत आहे. यादीभाग क्रमांक ७५ ते ७९ मध्ये अरबाज शेख मित्र मंडळ आणि मतीन युसुफ शेख (बब्बू भाई) मित्र मंडळाच्या पुढाकारातून मतदार नोंदणी व दुरुस्ती मोहिमेला गती मिळाली असून, गेल्या दहा दिवसांत सुमारे ९०० ते १,००० नागरिकांचे अर्ज भरून देण्यात आले आहेत.

दोन्ही मंडळांच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांना नवीन मतदार नोंदणी, नाव समाविष्ट



करणे, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन केले. शासकीय प्रक्रियेत प्रत्यक्ष मदत मिळाल्याने नागरिकांचा प्रतिसादही वाढला असून मतदार नोंदणीची प्रक्रिया सुलभ झाली आहे.

या उपक्रमाला बीएलओंसह संबंधित अधिकाऱ्यांनी भेट देऊन सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. यावेळी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत नाव नोंदवून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

एसआयआर मोहिमेंतर्गत आयोजित शिबिरांना परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मोठ्या संख्येने नागरिक आपली मतदार नोंदणी, दुरुस्ती व अन्य कामे पूर्ण करत आहेत.

''सशक्त लोकशाहीसाठी प्रत्येक मतदार महत्त्वाचा'' या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे मतदार जनजागृतीला चालना मिळाल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वयंसेवी सहभाग महत्त्वाचा ठरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

## सायटेशन नोटीस

दि. १३/०७/२०२६

प्रो.फी.जमा.रु. पान नं.
चौ.अ.नं. १३४/२०२६

**पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात**
**अर्जदार : श्री. संदिप सोन्याबापु चितळे, रा. चितळवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर**
**सामनेवाला : ग्रामपंचायत कार्यालय चितळवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर**

सदर अर्जदार हा मौजे चितळवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी आहे. सदर अर्जदार यांचा मुलगा नामे समाधान संदिप चितळे यांचा जन्म मौजे चितळवाडी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे १७/०५/२०१३ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय चितळवाडी येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय चितळवाडी यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे चितळवाडी जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजनेकामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय चितळवाडी, ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत चितळवाडी, ता. पाथर्डी येथे जावून जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत २५/०६/२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आतमध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते, अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय चितळवाडी, ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदारास त्यांचा मुलगा नामे समाधान संदिप चितळे जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक १३/०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे
हुकुमावरुन.

शिक्का

**निवासी नायब तहसिलदार**
**तहसिलदार पाथर्डी करीता**

## सायटेशन नोटीस

१०/०७/२०२६

प्रो.फी.जमा.रु. पान नं.
चौ.अ.नं. १७६/२०२५

**पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात**
**अर्जदार : श्री. सलीम मोहंमद सय्यद रा माणिकदोंडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर**
**सामनेवाला : ग्रामपंचायत कार्यालय माणिकदौंडी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर**

सदर अर्जदार हा मौजे माणिकदौंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी आहे. सदर अर्जदाराचा स्वतःचा जन्म मौजे माणिकदौंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथे ०१/०१/१९६६ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय माणिकदौंडी येथे कळविले होते; परंतु ग्रामपंचायत कार्यालय माणिकदौंडी यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतःच्या जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजनेकामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतःच्या जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय माणिकदोंडी, ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत माणिकदौंडी ता. पाथर्डी येथे जावून जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत दिनांक ०६/११/२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आतमध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते, अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय माणिकदौंडी, ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदारास त्यांचे स्वतःच्या जन्म जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे
हुकुमावरुन

शिक्का

**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर, मंगळवार, दि.१४ जुलै २०२६, पान नं. ८

## खताची कृत्रिम टंचाई करणाऱ्यांवर कारवाई

### आमदार खताळ; तालुक्यासाठी ७०० मेट्रिक टन युरिया उपलब्ध



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर युरिया खताचा पुरेसा व वेळेवर पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने आवश्यक नियोजन केले असून तालुक्यासाठी सुमारे ७०० मेट्रिक टन युरिया उपलब्ध करण्यात आला आहे. त्यापैकी ३५० मेट्रिक टन युरिया तातडीने विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला असून जर खताची कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्री करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, अशा इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला.

खरीप हंगामात युरिया खताची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध व्हावे, यासाठी आमदार अमोल खताळ यांच्या संपर्क कार्यालयात सोमवारी (दि. १३ जुलै) कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील युरिया खतसाठा, वितरण व्यवस्था, उपलब्धता तसेच पुढील नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, पंचायत समिती कृषी अधिकारी उघडे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

> ''तालुक्यासाठी आवश्यक असलेला युरिया खतसाठा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणतीही घाई किंवा घबराट न करता गरजेनुसारच खताची खरेदी करावी. कृषी विभाग सातत्याने लक्ष ठेवून असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त खतसाठा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावरही पाठपुरावा सुरू आहे. कोणत्याही शेतकऱ्याला खतासाठी वंचित राहू दिले जाणार नाही. तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करणे, साठेबाजी करणे किंवा जादा दराने खताची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात येईल.''
>
> **–अमोल खताळ, आमदार.**

# वाढत्या गुन्हेगारीवर आळा घाला

## आ. आशुतोष काळेंच्या पोलीस प्रशासनाला सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, बस स्थानक परिसर तसेच संवेदनशील भागांमध्ये नियमित पोलीस गस्त वाढविणे, रात्रीच्या वेळी विशेष गस्त पथके तैनात करणे, संशयित व्यक्तींवर बारकाईने लक्ष ठेवणे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून प्रभावी निगराणी ठेवणे आणि गुन्हेगारांविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करावी, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत.





कोपरगाव शहरात वाढत असलेली गुन्हेगारी, चेन स्नॅचिंगच्या घटना तसेच बंद घरफोडीच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहर व ग्रामीण पोलीस निरीक्षकांची संयुक्त आढावा बैठक घेत कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना देतांना ते बोलत होते.

या बैठकीत आ. आशुतोष काळे यांनी शहर व ग्रामीण भागातील गुन्हेगारीच्या घटनांचा सविस्तर आढावा घेतला. विशेषतः नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या चेन स्नॅचिंग, बंद घरफोडी, चोरी तसेच इतर गंभीर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कोपरगाव शहर व तालुक्यातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित वातावरण मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाने अधिक दक्षता घेऊन गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करावे, असे निर्देश आ. काळे यांनी यावेळी पोलीस प्रशासनाला दिले.

> गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबरोबरच, नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देण्याच्या सूचना दिल्या. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविणे, तसेच नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल अथवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

बैठकीत उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांनी शहर व ग्रामीण भागात सुरू असलेल्या गुन्हे प्रतिबंधक उपाययोजनांची माहिती दिली. आगामी काळात गस्त वाढविणे, तपासाची गती वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हे उघडकीस आणण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.या बैठकीस कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक उद्धव डमाळे व ग्रामीण पोलीस पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आदींसह पोलीस उपनिरीक्षक उपस्थित होते.

## गगनगिरी महाराज सप्ताहानिमित्त चांदीचा मुकूट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** गगनगिरी महाराज सप्ताहानिमित्त चांदीचा मुकुट व पानसुपारी अर्पण धार्मिक परंपरेप्रती श्रद्धेचा अनोखा आविष्कार संगमनेर शहरात आयोजित करण्यात आलेल्या परमपूज्य गगनगिरी महाराज सप्ताह सोहळ्याच्या पावन निमित्ताने श्रद्धा, भक्ती आणि सेवाभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे संगमनेर येथील माननीय सुधीर दिगंबर मैड यांच्या परिवारातर्फे महाराजांना चांदीचा आकर्षक मुकुट तसेच चांदीची पानसुपारी अर्पण करून भक्तिभाव व्यक्त करण्यात आला.

यावेळी सुधीर मैड यांच्यासह ऋषभ मैड, मनीषाताई मैड आणि श्रावणीताई मैड यांच्या वतीने हा विशेष मानाचा नजराणा अर्पण करण्यात आला. विशेष म्हणजे, ही पवित्र भेट त्यांच्या मातोश्रींच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली. मातृशक्तीच्या हस्ते झालेल्या या अर्पणामुळे कार्यक्रमाला अधिकच आध्यात्मिक आणि भावनिक स्वरूप प्राप्त झाले. चांदीचा मुकुट हा केवळ एक अलंकार नसून भक्तांच्या अखंड श्रद्धेचे आणि गुरूभक्तीचे प्रतीक मानला जातो. महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात आलेला हा मुकुट भक्ती, समर्पण आणि सेवाभाव यांचा तेजस्वी आविष्कार ठरला. तसेच चांदीची पानसुपारी अर्पण करून मैड परिवाराने भारतीय धार्मिक संस्कृतीतील आदर, सन्मान आणि परंपरेचे जतन करण्याचा संदेश दिला.

संगमनेर परिसरात धार्मिक कार्यांसाठी ओळखला जाणारा मैड परिवार विविध सामाजिक, धार्मिक आणि लोकहिताच्या उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान देत असतो. समाजकार्य आणि धर्मकार्य यांचा सुंदर समतोल साधत त्यांनी जनमानसात विशेष स्थान निर्माण केले आहे. गगनगिरी महाराज सप्ताहासारख्या पवित्र सोहळ्यात त्यांनी केलेले हे योगदान उपस्थित भाविकांसाठी प्रेरणादायी ठरले.

## कुरेशी जमात ट्रस्टच्यावतीने एसआयआर शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील कुरेशी जमात खाना येथे श्रीरामपूर कुरेशी जमा ट्रस्टच्या वतीने मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मतदान केंद्र क्रमांक ८१ ते ९२ या केंद्रातील मतदारांसाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे यामध्ये संपूर्ण वार्ड क्रमांक दोन तसेच नेहरूनगर गोदावरी रोडचा काही भाग, अहिल्यादेवी नगर परिसराचा समावेश आहे.

हे शिबिर १५ जुलैपर्यंत चालणार आहे. या शिबिरासाठीसाठी प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंद कुमार वाघ तसेच निवडणूक शाखेचे विशेष सहकार्य लाभले. या सर्व मतदान केंद्राचे बीएलओ अजीज शेख, इब्राहिम बागवान, इक्बाल काकर,समिनाबानो शेख, रजिया मोमीन, सफीया शेख, मच्छिंद्र गायकवाड, साबीर शाह, शहेजाद शेख, मोहम्मद तन्वीर रजा, अजित कदम, नितीन थोरात यांनी आपापल्या मतदान केंद्रातील मतदारांचे समुपदेशन करून त्यांचे एस आय आर फॉर्म भरून घेत आहेत. मतदान केंद्र भाग यादी क्रमांक ८१ ते ९२ मधील सर्व स्त्री-पुरुष मतदारांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.फातिमा कॉलनीतील मुसा मशीद येथे देखील एस आय आर कॅम्प आयोजित करण्यात आला होता.

## तलाठ्याने घातला तरुणाच्या डोक्यात माईक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील राजेवाडी येथील एका विवाह सोहळ्यात स्वागत करत असताना नाव न घेतल्याच्या रागातुन तलाठ्याने नावे पुकारत आसलेल्या तरुणाच्या डोक्यात लोखंडी माईक घालुन गंभीर जखमी केले. ही घटना शनिवारी (११ जुलै) दुपारी घडली. या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात तलाठी शिवाजी सखाराम हजारे याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जवळा येथिल फिर्यादी तरुण अशोक रामचंद्र पठाडे (वय ३७, रा. जवळा, ता. जामखेड) हे राजेवाडी येथील मातोश्री मंगल कार्यालयात आयोजित विवाह सोहळ्यास उपस्थित होते. फीर्यादी यांच्या गावातीलच लग्न आसल्याने ते माईकवर बोलत होते. विवाहासाठी आलेल्या नातेवाईक व गावकऱ्यांचे माईकवरून स्वागत करित होते. यावेळी लग्नाला उपस्थित असलेल्या आरोपी तलाठी शिवाजी सखाराम हजारे (रा. जवळा, ता. जामखेड) यांनी फिर्यादी पठाडे यांच्याकडे येऊन, ''माझे नाव माईकवर का पुकारले नाही?' असा जाब विचारला. यानंतर आरोपीने शिवीगाळ करत फिर्यादी यांच्या तोंडावर मारहाण केली. तसेच हातातील लोखंडी रॉड असलेला माईक हिसकावून त्यांच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाले. यावेळी तु लई माजला का? ''तुला खल्लास करतो'' अशी धमकी दिली व नंतर हजारे हा घटनास्थळाहून पळून गेला.

## आकाश दुबैया हत्या प्रकरणात तिघेच आरोपी

### अफवांवर विश्वास ठेवू नका; श्रीरामपुरात कोंबिंग ऑपरेशन सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आकाश दुबैया हत्या प्रकरणात मुंबईहून आलेल्या व्यक्तींचा सहभाग असल्याच्या चर्चांना पोलिसांनी स्पष्टपणे फेटाळले आहे. या गुन्ह्यात केवळ तीन आरोपींचा सहभाग असून तिघांनाही अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला संशयित मानण्यात आलेल्या अन्य दोघांचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध आढळलेला नसल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भवर म्हणाले, ''तपासात या हाणामारीत कोणत्याही प्रकारच्या हत्याराचा वापर झाल्याचे निष्पन्न झालेले नाही. हॉटेलमध्ये जेवणाच्या ऑर्डरवरून झालेल्या वादातूनच ही घटना घडली आहे. त्यामुळे या प्रकरणाबाबत सुरू असलेल्या विविध चर्चांमध्ये तथ्य नसून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.'' शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली आहे. सोमवारी दिवसभरात विनानोंदणी क्रमांकाच्या अनेक दुचाकींवर कारवाई करण्यात आली. तसेच सराईत गुन्हेगारांवर वचक बसविण्यासाठी विविध भागांत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

सध्या श्रीरामपूर शहरात व्यापक कोंबिंग ऑपरेशन सुरू असून संशयित व्यक्ती आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांची पडताळणी केली जात आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जयदत्त भवर यांनी दिला.

## नगराध्यक्ष डॉ. घुले यांचे आरोप खोटे

### उपनगराध्यक्ष शालिनी सुखधान यांचे प्रत्युत्तर!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** ''आम्ही शहराच्या विकासकामांना कधीही विरोध केलेला नाही. उलट, विकासविरोधी म्हणून ज्या विषयांचा उल्लेख केला जात आहे, तेच विषय २० एप्रिल २०२६ च्या सभेत बहुमताने मंजूर झाले होते. आमचा विरोध विकासाला नसून, नियमबाह्य व अपूर्ण अजेंड्याला आहे,'' असे प्रतिपादन नेवासा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष शालिनी सुखधान यांनी निवेदनात केले आहे. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी केलेल्या आरोपांना त्यांनी पुराव्यांसह उत्तर दिले.

सुखधान यांनी म्हटले आहे की, दोन महिन्यांपूर्वी राजकारण बाजूला ठेवून शहर विकासासाठी सर्व १७ नगरसेवकांची बैठक झाली होती. आमच्या गटाकडे १० नगरसेवकांचे बहुमत असूनही ५०-५० टक्के निधी वाटपास सहमती दर्शवून आमच्या प्रभागांतील विकासकामांचे प्रस्ताव नगराध्यक्षांकडे दिले. मात्र, ३ जुलैच्या सभेच्या अजेंड्यात आमच्या गटाच्या एकाही कामाचा समावेश करण्यात आला नाही. अजेंड्यासोबत कामांचा तपशील, निधी, प्रभाग, अपेक्षित खर्च, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता किंवा मुख्याधिकाऱ्यांचे टिपण जोडले नव्हते. केवळ ''आवश्यकतेनुसार गटार, रस्ते, पाणीलाईन'' असे मोघम शब्द वापरून अजेंडा तयार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. २४ जून रोजी याबाबत लेखी हरकत घेतल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनीही टिपण्या तयार नसल्याचे लेखी मान्य केले होते. तरीही ७ जुलैच्या सभेत हाच नियमबाह्य अजेंडा मंजुरीसाठी ठेवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.



### उपनगराध्यक्षांनी सादर केलेले पुरावे

उपनगराध्यक्ष शालिनी सुखधान यांनी प्रसिद्धीपत्रकासोबत १५ जूनचा विकासकामांचा प्रस्ताव, २३ जूनचा अजेंडा, २४ जूनची लेखी हरकत, मुख्याधिकाऱ्यांकडे केलेली टिपण्यांची विचारणा आणि आवश्यक टिपण्या उपलब्ध नसल्याची मुख्याधिकाऱ्यांची लेखी कबुली अशी पाच अधिकृत कागदपत्रे जोडल्याचा दावा केला आहे.

## 'जगताप योग्यरित्या जबाबदारी सांभाळू शकतात'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** महिला म्हणून अनिताताई जगताप यांना मला जिल्हा नियोजन समितीवर काम करण्याची संधी देता आली त्याचे मला समाधान असून त्यांनी शिर्डी शहराच्या नगराध्यक्षा म्हणून उत्तमरीत्या जबाबदारी सांभाळली आहे. नगरसेविका तसेच इतर विविध राजकीय व सामाजिक पदांचा त्यांना अनुभव असल्याने त्या या पदाची जबाबदारी योग्यरीत्या सांभाळू शकतात, असा मला विश्वास आहे, अशी प्रतिक्रिया जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अनिताताई विजयराव जगताप यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्यक्त केली.

शिर्डी साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना यांच्या वतीने जिल्हा नियोजन व विकास समितीच्या सदस्यपदी निवड झालेल्या अनिताताई जगताप यांच्या सत्कार समारंभासाठी ना. राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्षा जयश्री थोरात व शहरातील विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अनिताताई जगताप यांचा सन्मान करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नगराध्यक्षा सौ. थोरात यांनी देखील सत्कार केला.

अनिताताई जगताप म्हणाल्या, ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माझी जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी निवड केली त्याबद्दल मी त्यांचे मनस्वी आभार मानते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला सर्वसामान्य नागरिकांच्या विविध अडचणी सोडवण्यासाठी कायम सहकार्य केले आहे.

# दोन कोटींचा रस्ता की खड्ड्यांचे साम्राज्य?

## कर्जतच्या मुख्य रस्त्यावर नागरिकांचा संताप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत शहरातील मुख्य रस्त्यासाठी तब्बल दोन कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. मात्र एवढी मोठी रक्कम खर्च करूनही आज हा रस्ता अक्षरशः खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. यंदा अद्याप समाधानकारक पाऊसही झालेला नसतानाही रस्त्याची झालेली दुरवस्था पाहता कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या रस्त्याचे काम ए. सी. कोठारी कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने केले असून, काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. रस्त्यावरील डांबर अनेक ठिकाणी उखडून गेले असून मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे अपघातांची मालिका सुरू झाली आहे. शाळकरी मुले-मुली, दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक यांना या रस्त्यावरून जाताना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक दुचाकीस्वार खड्ड्यांमध्ये घसरून जखमी झाले असून चारचाकी वाहनांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. मुख्य बाजारपेठेतील हा रस्ता असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.



> ''कोट्यवधी रुपये खर्च करूनही नागरिकांना खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागत असेल, तर हा विकास नेमका कोणासाठी?'' असा संतप्त सवाल आता कर्जतकर विचारू लागले आहेत. कॉन्ट्रॅक्टर ए. सी. कोठारी यांच्यावर निकृष्ट काम केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी देखील नागरिकांकडून होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी गुन्हा दाखल करण्याचे धाडस दाखवणार का?

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या रस्त्याची देखभाल करण्याची जबाबदारी असलेला ठेकेदार मागील अनेक महिन्यांपासून गायब असल्याची चर्चा आहे. तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ''दोन कोटी रुपये खर्च झाले नेमके कुठे?'' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. एवढा निधी खर्च करूनही काही महिन्यांतच रस्ता उखडत असेल, तर कामाची गुणवत्ता कोणी तपासली? संबंधित अधिकाऱ्यांनी याचे उत्तर द्यावे, अशी मागणी होत आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.